# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

## २००९-२०१० चा पाचवा वार्षिक अहवाल

### अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | पान क्र. |
|---|---|---|
| १. | कंपनीच्या संचालकांची नावे | ०१ |
| २. | संचालकांचा अहवाल | ०२ |
| ३. | पुरवणी तक्ता (अ) लेखा परिक्षकांचा अहवाल व दिलेली उत्तरे | ०९ |
| ४. | महालेखाकाराचे भाष्य व दिलेली उत्तरे | २० |
| ५. | लेखा परिक्षकांचा अहवाल | ४८ |
| ६. | आर्थिक ताळेबंद | ५५ |
| ७. | नफा-तोटा विवरण | ५६ |
| ८. | ताळेबंद अंतर्गत येणाऱ्या अनुसूची | ५७ |
| ९. | समभाग | ५७ |
| १०. | भाग भांडवल निलंबित लेखा खाते | ५७ |
| ११. | राखीव आणि अतिरिक्त | ५७ |
| १२. | सुरक्षित कर्जे | ५७ |
| १३. | असुरक्षित कर्जे | ५७ |
| १४. | स्थिर मत्ता | ५८ |
| १५. | गुंतवणूकी | ५९ |
| १६. | वस्तुची यादी | ५९ |
| १७. | किरकोळ देणेकरी | ५९ |
| १८. | रोकड रक्कम आणि बँकेतील रक्कम | ५९ |
| १९. | कर्जे आणि अग्रीम रक्कम | ६० |
| २०. | चालु दायित्वे | ६० |

| अ.क्र. | तपशिल | पान क्र. |
|---|---|---|
| २१. | तरतुदी | ६० |
| २२. | संर्किण खर्च | ६० |
| २३. | नफा-तोटा विवरण अंतर्गतचे येणाऱ्या अनुसूची | ६१ |
| २४. | संचलनापासून महसूल | ६१ |
| २५. | इतर उत्पन्न | ६१ |
| २६. | संचलनासाठी खर्च | ६१ |
| २७. | कर्मचाऱ्यावरील खर्च | ६१ |
| २८. | प्रशासनावरील खर्च | ६२ |
| २९. | घसारा आणि इतर कर्ज फेडीची तरतूद (नोंद ३ पहा एच. पहा) | ६२ |
| ३०. | व्याज व वित्तीय आकार | ६२ |
| ३१. | गतकालीन बाबी (नक्त) | ६३ |
| ३२. | रोकड प्रवाह | ६४ |
| ३३. | लेखा टिप्पणी | ६५ |
| ३४. | आर्थिक ताळेबंदाचा गोषवारा आणि कंपनीचे सामान्य धंदाची रुपरेखा | ९२ |

# संचालक मंडळ

| अ.क्र. | नाव |
| --- | --- |
| १. | **श्री. अरविंद सिंह**<br>अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक |
| २. | **श्री. आर. एम. प्रेमकुमार**<br>अध्यक्ष<br>(दि. १८-०६-२०१० पासून कार्यकाल समाप्त) |
| ३. | **श्री. सुब्रत रथो**<br>ऊर्जा सचिव<br>संचालक<br>(नियुक्ती दि. २२-०६-२०१० पासून) |
| ४. | **श्री. प्रमोद खंडाळकर**<br>संचालक (वित्त)<br>(दि. ०७-०५-२०१० पासून कार्यकाल समाप्त) |
| ५. | **श्री. दत्तात्रय वाव्हळ**<br>संचालक (वित्त)<br>प्रभारी (दि. ०७-०५-२०१० पासून) |
| ६. | **श्री. जी. एस. लिमये**<br>संचालक (संचलन)<br>(दि. ३१-०३-२०१० पासून कार्यकाल समाप्त) |
| ७. | **श्री. उत्तम गोपीनाथराव झाल्टे**<br>संचालक (संचलन)<br>(नियुक्ती दि. ०५-०८-२०१० पासून) |
| ८. | **श्री. डब्ल्यु. आर. अस्वार**<br>संचालक (प्रकल्प) |
| ९. | **श्री. अविनाश पाटील**<br>स्वतंत्र संचालक |
| १०. | **डॉ. ज्योती अरोरा**<br>कंपनी सचिव<br>(नियुक्ती दि. १८-०२-२०१० पासून) |

**लेखा परिक्षक**

**शहा ॲन्ड टापडिया**

सनदी लेखापाल

---

**रजिस्टर्ड ऑफिस**

प्रकाशगंगा, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

# संचालकांचा अहवाल

प्रति,

सभासद,

आपल्या संचालकांना ३१ मार्च २०१० रोजीचा कंपनीचा व्यवसाय व संचलन या बाबतचा पाचवा वार्षिक अहवाल व लेखा परिक्षित केलेले लेखा विवरण पत्र दोन्ही एकत्रितपणे सादर करताना आनंद होत आहे.

**आर्थिक निष्कर्ष :**

कंपनीच्या ३१ मार्च २०१० रोजी संपलेल्या वर्षांचे आर्थिक निष्कर्ष खालीलप्रमाणे :-

| | **आर्थिक वर्ष** | |
|---|---|---|
| | **₹ लाखात** | |
| **तपशील** | **२००९-१०** | **२००८-०९** |
| व्यवसायापासून महसूल | १,५९,९७३ | १,८६,९९५ |
| अधिक : इतर उत्पन्न | १०,८३७ | ६,१३५ |
| **एकूण महसूल** | **१,७०,८१०** | **१,९३,१३०** |
| व्यवसाय खर्च | ३०,४३३ | ३९,३५३ |
| कर्मचाऱ्यावरील खर्च | ३९,३९७ | ६०,३५८ |
| प्रशासकीय खर्च | १०,३४४ | १४,३२२ |
| व्याज व वित्तीय आकार | २०,९९९ | २५,६१५ |
| **घसारा सोडून एकूण खर्च** | **१,०१,१७३** | **१,३९,६४८** |
| **घसारा व करपूर्व नफा** | **६९,६३७** | **५३,४८२** |
| घसारा आणि इतर कर्जफेडीची तरतूद | २९,९६२ | ३२,१७५ |
| **करपूर्व नफा** | **३९,६७५** | **२१,३०७** |
| कराची तरतूद (फ्रिंज बेनिफिट करासाठीची तरतूद समाविष्ट) | ६,४०० | १३,१३७ |
| स्थगित कर | ५,९०२ | (५,२३६) |
| **करभरल्यानंतरचा नफा** | **२७,३७३** | **१३,४०६** |
| करासाठी अलिकडील वर्षांची कमी तरतूद | -- | (८२) |
| पूर्वकालीन बाबी (निव्वळ) | (२,८७१) | ४२८ |
| **कर आणि समायोजना नंतरचा नफा** | **२४,५०२** | **१३,७५२** |
| अधिक : मागील वर्षाची शिल्लक नफा पुढे ओढला | ९३९ | ६१,४६४ |
| वजा : खास राखीवसाठी अंशदान | १,३५२ | ९३७ |
| वजा : आकस्मिक राखीवसाठी अंशदान | २,४५४ | २,३०२ |
| वजा : कर्मचारी हितार्थ तात्पुरती सोय | --- | --- |
| वजा : स्थगीत खर्च दायित्व (नक्त) कडे स्थानांतर | --- | ७१,०३८ |
| **शिल्लक नफा पुढे ओढला** | **२१,६३५** | **९३९** |

**आर्थिक गुण विशेष : दर आकारणीत घट झाल्यामुळे**

वर्ष भराच्या कालावधीत महसूल मागील वर्षाच्या ₹ १९३१३०/- लाखावरुन यावर्षी ₹ १७०८१०/- इतका म्हणजेच १२ टक्क्याने कमी आहे. करपूर्व नफा २००८-२००९ च्या ₹ २१३०७/- लाखांवरुन २००९-२०१० साली ₹ ३९६७५/- लाखावर स्थिरावला आहे. तर करोतर नफा २००९-१० मध्ये ₹ २४५०२/- लाख व २००८-०९ मध्ये ₹ १३७५२/- इतका आहे.

**संयुक्त कारभार :**

१) म.रा.वि.पारेषण मर्यादित कंपनी व जे.एस.डब्ल्यु एनर्जी मर्यादित कंपनीमधील संयुक्त करारानुसार महाराष्ट्र राज्यातील पारेषण प्रणालीत सुधारणा होण्यासाठी आमच्या कंपनीने २६ टक्के रक्कम जयगड पॉवर मर्यादित कंपनीत गुंतवलेली आहे. प्रकल्पाचा विद्यमान स्थितीचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

२) महाराष्ट्र राज्यातील रत्नागिरी जिल्ह्यात जे एस डब्ल्यु एनर्जी मर्यादित कंपनीच्या १२०० मेगावॅट क्षमतेच्या मेसर्स जयगड औष्णीक विज केंद्रातून वीज घेऊन पारेषण प्रणालीत सुधारणा करण्यासाठी सदरची संयुक्तरित्या काम करण्यासाठी कंपनी स्थापित करण्यात आली आहे.

३) सदरच्या संयुक्त कारभार कंपनीला महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगांकडून विद्युत कायदा २००३ च्या कलम १४ नुसार दिनांक ८ फेब्रुवारी २००९ पासून पारेषण परवाना बहाल करण्यात आलेला आहे. अशा प्रकारचा परवाना हा राज्य पारेषण उपयुक्तता आणि पारेषण क्षेत्रातील खाजगी कंपनीच्या संयुक्त कारभार समितीला प्रथमच दिलेला आहे. हा परवाना कंपनीला ४०० के.व्ही. न्यू कोयना व रायगड - कराड पारेषण वाहिनी २५ वर्षापर्यंत स्थापित, संचलन व सुव्यवस्थित ठेवण्यासाठीचे अधिकार प्रदान करतो.

४) संयुक्त कारभार कंपनीने राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धात्मक बोलीद्वारे प्रकल्पाची किंमत कमी ठेवण्याच्या दृष्टीकोनातून लार्सन ॲन्ड टुब्रो कंपनीच्या इसीसी विभागाबरोबर अभियांत्रिकी बांधकाम करार (इसीसी) घडवून आणला आहे. परिक्षीत ४०० केव्हीचे मनोरे व पायाभरणी संबंधातील नकाशा पॉवर ग्रिड कॉर्पोरेशनकडून मिळविण्यात आला. कामाची गुणवत्ता अबाधित राखून प्रकल्पाची वेळेवर अंमलबजावणी होण्यासाठी ४०० केव्ही पारेषण वाहिनीच्या कामातील विशेष नैपुण्य असलेल्या स्टाफसहित पॉवरलिंक पारेषण कंपनीला प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमण्यात आलेले आहे.

५) संयुक्त कारभार कंपनीच्या वतीने म.रा.वि.पा.कंपनीने इएचव्ही सबस्टेशन, कराड व न्यू कोयना येथे पारेषण वाहिनीचे टर्मिनेशन सुलभपणे व्हावे करिता टर्मिनल बे उभारणीचे काम हाती घेतले आहे. तसेच उपरोक्त कामास म.रा.वि.पा.कंपनीने मंजुरी दिलेली आहे व न्यू कोयना सब स्टेशनमधील टर्मिनल बे उभारणीचे काम यशस्वीरित्या पुर्णही झालेले आहे. कराड इ एच व्ही सब स्टेशनमधील जमीन संपादिकरणाचे काम पूर्ण झालेले आहे व टर्मिनल बे उभारणीचे काम हाती घेण्यात आलेले आहे.

६) न्यु कोयना सब स्टेशन अखेरच्या बाजुकडून ४०० केव्ही डबल सर्किट जयगड- न्यु कोयना पारेषण वाहिनी दि. ६ एप्रिल २०१० पासून यशस्वीरित्या कार्यान्वीत करण्यात आली आहे आणि १२०० मेगावॅट जयगड उर्जा प्रकल्पामधील जीआयएस (गॅस इन्सुलेशन स्विचगेअर) चे काम पूर्ण झाल्यानंतर सदरच्या प्रकल्पामधील ३०० मेगावॅट युनिट दि. १६/४/२०१० पासून कार्यान्वीत करण्यासाठी पारेषण वाहिनी न्यू कोयना सब स्टेशन ते जयगड प्रकल्पापर्यंत उर्जावहन करेल.

**लाभांश :**

लाभांशाची रक्कम विविध पायाभूत प्रकल्पासाठी वापरण्यात आल्यामुळे सन २००९-१० वर्षासाठी म.रा.वि.पा.कंपनीने लाभांश जाहिर केला नाही.

**कायमस्वरुपी ठेवी :**

कंपनी कोणत्याही प्रकारच्या कायम स्वरुपी ठेवी स्विकारत नाही. ताळेबंदाच्या तारखेपर्यंत कोणत्याही प्रकारची मुळ रक्कम त्यावरील व्याज देणे बाकी नाही आणि म्हणून बँकेप्रमाणे आणि वित्तीय संस्थांच्या व्यवहाराप्रमाणे व्यवहार नसलेल्या कंपन्यांसाठी रिझर्व बँकेने १९५६ च्या आदेशानुसार आणि कंपनी (ठेवी स्विकारणे) नियमावली १९७५ नुसार उक्त ठेवीबाबतची माहिती देण्याची गरज नाही.

**सूत्रधार कंपनी :**

कंपनी कायदा १९५६ मधील ४ (१) (अ) आणि ४(२) मधील तरतुदी नुसार आमची कंपनी म.रा.वि.म. सुत्रधार कंपनी मर्यादितची दुय्यम कंपनी आहे.

**संचालक**

**अ) रचना - मंडळामध्ये पाच संचालकाचा समावेश आहे.**

**ब) आळीपाळीने निवृत्ती**

कंपनीच्या नियमावलीनुसार व कंपनी कायदा १९५६ मधील गरजेनुसार श्री. सुब्रत रथो व श्री. उत्तम गोपीनाथराव झाल्टे हे संचालक आळीपाळीने निवृत्त होतील व पुर्ननेमणुकीसाठी प्रस्ताव सादर करण्यास पात्र असतील.

**क) वर्षभरातील स्थित्यंतरे :-**

दि. ११ जून २०१० पासून श्रीयुत आर.एम.प्रेमकुमार यांनी कंपनीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे.

श्रीयुत पी. जी. खंडाळकर यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दि. ७ मे २०१० रोजी संपत असल्यामुळे त्यांची बदली त्यांच्या मुळ संस्थेकडे करण्यात आली.

श्रीयुत जी.एस.लिमये यांनी ३१ मार्च २०१० पासून संचालक (संचलन) पदाचा राजीनामा दिलेला आहे व श्री. उत्तम गोपीनाथराव झाल्टे यांची ५ ऑगस्ट २०१० पासून अतिरिक्त संचालक म्हणून नेमणूक झाली आहे.

श्रीयुत सुब्रत रथो उर्जा सचिव यांची २२ जून २०१० पासून अतिरिक्त संचालक म्हणून नेमणुक केली गेली.

**ड) मंडळ सभा :**

दि. ३१/ ३/ १० अखेरपर्यंत मंडळाने एकूण १३ वेळा सभा घेतल्या आहेत.

**हिशेब तपासणी समिती :**

हिशेब तपासणी समितीची स्थापना ३० सप्टेंबर २००९ रोजी केली गेली. त्यानंतर सदर समितीची पुर्नस्थापना दि. २४ ऑगस्ट २०१० रोजीच्या मंडळ सभेमध्ये करण्यात आली आणि सध्या त्यामध्ये खालील संचालकाचा अंतर्भाव आहे.

श्री. अविनाश पाटील – अध्यक्ष

श्री. सुब्रत रथो

श्री. उत्तम गोपीनाथराव झाल्टे

**संचालकांच्या जबाबदारीबाबत विवरण :**

कंपनी कायदा १९५६ आणि त्याखालील कलम २१७(२अ अ) नुसार विभागाप्रमुखाकडून प्राप्त झालेल्या निवेदनाचे आधारे संचालक अशी खात्री करतात की :

१) वार्षिक लेखे बनविताना लागू असलेल्या सर्व लेखा मानकांचे पालन केलेले आहे आणि ज्या बाबतीत केलेले नाही त्याचे स्पष्टीकरण दिले आहे.

२) संचालकांनी अशा लेखांकन धोरणाची निवड करुन लागू केली आहेत तसेच निर्णय घेतले आहेत व अंदाज केले आहेत. की जे सुयोग्य व दूरदर्शी आहेत व त्यामुळे कंपनीच्या स्थितीचे, नफा-तोटा पत्रकाचे त्या आर्थिक वर्षाच्या शेवटी सत्य व उचित चित्र स्पष्ट होते.

३) संचालकांनी कंपनीच्या मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी व घोटाळे व अफरातफर शोधून काढून त्याला प्रतिबंध घालण्यासाठी कंपनी कायद्यात असलेल्या तरतुदीनुसार पर्याप्त लेखा नोंद ठेवण्यासाठी योग्य व पुरेशी काळजी घेतली आहे.

४) संचालकांनी चालू तत्त्वावर लेखे बनवले आहेत.

**अंतर्गत नियंत्रणाची पर्याप्तता :**

कंपनीच्या सर्व मालमत्तेचे अनधिकृत वापरापासून संरक्षणासाठी किंवा मालमत्तेची योग्य मांडणी / रचना होण्याकरिता कंपनीची अंतर्गत नियंत्रण प्रणाली योग्य व पर्याप्त आहे आणि कंपनीच्या नोंदी हया अधिकृत तसेच अचूकपणे नोंदलेल्या आहेत.

**सांघिक प्रशासन**
**आमचे जाळे :**

महाराष्ट्रातील अति उच्च दाब उपकेंद्राची संकलित संख्या रुपांतर करण्याची क्षमता आणि पारेषण तारांची लांबी (सीकेटी-किमी) खाली दाखविल्याप्रमाणे.

**महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी मर्यादितचे ३१-०३-२०१० रोजीचे मुलभूत घटक**

| अनु. क्र. | तपशील | अ.उ.दा. उपकेंद्राची संख्या | ए.व्ही.ए. मध्ये रुपांतर करण्याची क्षमता | अ.उ.दा. तारा सीकेटी किमी |
|---|---|---|---|---|
| १ | ५०० केव्ही एचव्हीडीसी | २ | ३५८२ | १५०४ |
| २ | ४०० केव्ही | २१ | १३१६५ | ६५६२ |
| ३ | २२० केव्ही | १४९ | ३१५८५ | १२३५६ |
| ४ | १३२ केव्ही | २४६ | १९८५२ | ११०६५ |
| ५ | ११० केव्ही | ३३ | २०९५ | १६९८ |
| ६ | १०० केव्ही | ३५ | २३७३ | ६७८ |
| ७ | ६६ केव्ही | ३४ | ११३९ | ३२७० |
| | **एकूण** | **५२०** | **७३७९१** | **३७१३३** |

**सांघिक प्रशासन**

**पूर्णवेळ संचालकांची आचारसंहिता :**

कंपनीच्या संचालक मंडळाने, पूर्णवेळ संचालकांसाठी आचार संहिता स्विकारली आहे. भागधारकांच्या सेवेसाठी सातत्यपूर्ण व्यवस्थापकीय कामकाज हा या संयुक्त प्रशासनाचा पाया असून यावर संहितेमध्ये प्रकाश झोत असून याशिवाय संचालक मंडळाच्या सदस्याच्या जबाबदाऱ्या प्रकटीकरण आणि गरजा यांची मानके अंतभूत आहेत.

**सांघिक सामाजिक जबाबदारी :**

जबाबदार सांघिक कंपनी म्हणून स्वत:ला प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने परिणामकारक संभाषक कार्यक्रम विकसित केलेला आहे. विकास व अंमलबजावणी या कार्यक्रमामुळे समाजामध्ये कंपनीबाबत विश्वास व नावलौंकिक निर्माण होईल.

**कर्मचाऱ्याबाबत तपशील :**

कंपनी कायदा १९५६ आणि त्याखालील कलम २१७ ( २ अ) अन्वये आणि कंपनी कामगार कायदा नियम १९७५ नुसार विहित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त मानधन कंपनीच्या कोणत्याही कामगाराने घेतलेले नाही.

**विजेचे जतन, (संरक्षण) तंत्रज्ञान ग्रहण, परकिय चलन आवक व जावक :**

**१) विजेची बचत :** वीज बचतीचा उपाय म्हणून उपकरणे व प्रणाली यांच्या कार्यक्षमतेत सुधारणा करण्यात आली आहे. तसेच वेगवेगळ्या उपकेंद्रामधील जुनी उपकरणे बदलण्यात आली आहेत. उर्जेचे लेखांकन करण्यासाठी पारेषण ते वितरण पारेषण ते निर्मिती क्षेत्रातील विशिष्ट बिंदुवर एबीटी मिटर्स बसविण्यात आले आहेत. विजेचे व्यवस्थापन व लेखांकनासाठी तसेच सबस्टेशन मधील वीजगळती, रोहित्रामधील वीजगळतीची गणना करण्यासाठी विविध अति उच्च दाब सब स्टेशन मधील प्रदायीवर ( ) व रोहित्रावर देखील मिटर्स बसविण्यात आले आहेत.

**२) तंत्रज्ञान आत्मसात करणे :**

**१. तंत्रज्ञानाचा स्वीकार, अंगिकार व नवीन उपक्रम याबाबत केलेले प्रयत्न थोडक्यात :**

१) क्षेत्रीय कार्यालयाना विविध प्रकारची स्टेट ऑफ द आर्ट निदानीकरण व तपासणी विषयक उपकरणे पुरविण्यात आली आहेत.

२) सध्याच्या जुनी संरक्षण प्रणालीचे नुतनीकरण सध्याच्या जुन्या व कालबाह्य संरक्षण योजनेच्या जागी स्टेट ऑफ द आर्ट संख्याविषयक संरक्षण प्रणालीची पुनरस्थापित करण्यात आली आहे.

३) सर्व ४०० केव्ही आणि गुंतागुंतीच्या अति उच्च दाब सबस्टेशनमध्ये, सबस्टेशन देखरेख प्रणाली (SAS) पुरवण्यात आली आहे. तसेच आता नवीन सबस्टेशनला संपुर्णपणे स्वयंचलित सबस्टेशन प्रणाली (SAS) पुरवण्यात येत आहे.

४) अति उच्च दाब सबस्टेशनमधील जुनी उपकरणे बदलून आयुष्यवर्धन योजनेची अंमलबजावणी करणे.

५) रोहित्राची आगीपासून बचाव करण्यासाठी अग्नीप्रतिबंधक प्रणालीही रोहित्राबरोबर पुरवण्यात येत आहे.

**२. या प्रयत्नातून मिळालेला फायदा :**

१) उपकरणाचे भविष्यातील बिघाडापासून संरक्षण करण्यासाठी प्रभावी देखभाल करता येते.

२) उपकरणामधील दोषाची सुधारीत विश्वसनियता व उपकरण वेगळे करण्यासाठीची यंत्रणा अधिक प्रभावी.

३) वीजप्रवाह खंडीत होण्याचे योग्य व अचुक निदान / दोषाच्या मुळ कारणाकडे अचुक निर्देश.

४) वीजप्रवाह खंडीताचे प्रमाण कमी होण्यात मदत.

५) प्रणालीची स्थिरता, उपलब्धता व सुधारीत विश्वसनियता अधिक.

**३) परदेशी चलन हे प्राप्त करणे तसेच बाह्य गोष्टी :** वित्तीय वर्ण २००९-१० मध्ये परकीय चलनप्राप्ती काही नाही आणि खर्चाची रक्कम ही ₹ २२९५८१९ इतकी होती.

**लेखा परिक्षक :**

**कॉस्ट ऑडिटर**

मध्यवर्ती सरकारच्या (मिनिस्टर ऑफ कॉर्पोरेट अफेअर) आदेशाप्रमाणे मेसर्स रोहित जे व्होरा यांची आर्थिक वर्ष २००९-२०१० साठी कॉस्ट ऑडिटर (परिव्यय लेखा परिक्षक) म्हणून नेमणूक केलेली आहे.

**वैधानिक लेखापरिक्षक :**

महापारेषण कंपनीचे संपूर्ण समभाग हे महाराष्ट्र शासनाच्या सात नामनिर्देशीत भागधारकांकडे असल्यामुळे कंपनी कायदा १९५६ मधील विभाग ६१७ नुसार आपली कंपनी ही शासकीय कंपनी आहे. म्हणून कंपनी कायदा कलम ६१९ (२) च्या तरतुदीनुसार शासकीय कंपनीचे लेखापरिक्षक हे नियंत्रक व महालेखाकार परिक्षक यांच्याकडून नियुक्त केले जातात. शहा आणि तापडिया चार्टड अकाऊंटन्ट, यांची कंपनी कायदा १९५६ मधील विभाग ६१९ नुसार आर्थिक वर्षे २००९-२०१० साठी नियंत्रक व महालेखाकार परिक्षकांनी कंपनीचे वैधानिक लेखापरिक्षक म्हणून नेमणूक केली आहे.

**वैधानिक लेखापरिक्षकांच्या टिप्पणीला दिलेले स्पष्टीकरण :**

नियामक व महालेखाकार परिक्षकाकडून लेख्यावरील भाष्य अद्याप आलेले नाही. ते प्राप्त झाल्यावर पुरवणी म्हणून प्रसारीत केले जाईल. कंपनी कायदा १९५६ मधील कलम २१७ (३) नुसार आवश्यक असलेली वैधानिक लेखापरिक्षकांच्या टिप्पणीला दिलेली उत्तरे या अहवालासोबत पुरवणी अ म्हणून दिलेली आहे.

**आभार प्रदर्शन :**

संचालक, महाराष्ट्र शासन, एम.ई.आर.सी. विविध सरकारी विभाग आणि अधिकारी, बँका, सल्लागार, पुरवठादार आणि जे.एस.डब्ल्यु इनर्जा तिसेच व्यवसायातील सहकारी यांनी जे सहकार्य केले व कंपनीवर विश्वास दाखविला त्याबद्दल कृतज्ञता नमूद करु इच्छितात व भविष्यकाळात अशाच प्रकारच्या सहकार्याची अपेक्षा करतात तसेच संचालक, कंपनीला सहकार्य व मदत देऊ करणाऱ्या सर्व स्तरावरील व सर्व प्रवर्गावरील कर्मचाऱ्यांचे आभार मानू इच्छितात.

संचालक मंडळाच्या वतीने
**महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी मर्यादित**

**सही/-**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
**(श्री. अरविंद सिंह)**

**ठिकाण : मुंबई**

**दिनांक : २३/०९/२०१०**

पुरवणी तक्ता - अ

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**दिनांक : ३१-०३-२०१० या कालावधीसाठी दिनांक २०१०**
**रोजी मिळालेल्या लेखा परीक्षा अहवालास दिलेली उत्तरे**

| | लेखा परिक्षकांचा अहवाल | म.रा.वि.पा.कं.लि.ची उत्तरे |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित कंपनीच्या (यानंतर म.रा.वि.पा.कं.म. असे संबोधले आहे.) दि. ३१-०३-२०१० रोजीच्या ताळेबंदाचे व त्यास जोडलेल्या ३१ मार्च २०१० रोजीच्या नफा तोटा व रोकडीच्या स्त्रोताच्या पत्रकाचे आम्ही परीक्षण केले. या वित्तीय विवरण पत्राची जबाबदारी कंपनी व्यवस्थापनाची आहे. आम्ही केलेल्या लेखा परिक्षणाच्या आधारे आर्थिक विवरण पत्रावर आमचे मत देणे ही आमची जबाबदारी आहे. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| २. | सर्वसाधारणपणे भारतामध्ये मान्य करण्यात आलेल्या लेखापरिक्षण विषयक पद्धतीनुसार आम्ही लेखा परिक्षण केले आहे. सदर पद्धतीनुसार आमच्याकडून अपेक्षा अशी आहे की वित्तीय विवरण वस्तुगत असत्यकथना पासून मुक्त असल्याची योग्य ती खातरजमा करण्याच्या दृष्टीकोनातून आम्ही योजना व कृती करावी. वित्तीय विवरण पत्रामध्ये दिलेल्या रकमेचे व खुलाशांचे आधारभूत पुरावे नमुन्यादाखल तपासणे या बाबींचा परिक्षणामध्ये समावेश असतो. तसेच उपयोगात आणलेली लेखा तत्त्वे, व्यवस्थापनाने केलेले महत्त्वाचे अंदाज आणि एकूणच विवरण पत्राचे सादरीकरण याचे मुल्यमापन करणे याचा परिक्षणामध्ये समावेश असतो. आम्हाला विश्वास आहे की आमच्या अभिप्रायाला आमच्या लेखा परिक्षणाचा योग्य आधार आहे. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| ३ | कंपनी अधिनियम १९५६ कलम २२७ उपकलम (४अ) अंतर्गत भारत सरकारने बनविलेल्या कंपनी (लेखा परिक्षकांचा अहवाल) आदेश २००३ आणि कंपनी (लेखा परिक्षकांचा अहवाल) (सुधारित) आदेश २००४ मध्ये केलेल्या सुधारणा अंतर्गत नमूद केलेल्या आदेशातील परिच्छेद ४ व ५ मधील कंपनीला लागू असणाऱ्या बाबी संबंधीचे विवरण परिशिष्ट म्हणून जोडले आहे. | संबंधित परिच्छेदाबाबतची उत्तरे स्वतंत्रपणे दिले आहे. |

| | | |
|---|---|---|
| ४ | खालील बाबींकडे आम्ही आपले लक्ष विशेष करुन वेधू इच्छितो.<br>अ) महाराष्ट्र शासनाने ४ जून २००५ रोजी अधिसूचित केलेल्या महाराष्ट्र विद्युत सुधारणा हस्तांतरण योजना २००५ नुसार (यानंतर हस्तांतरण योजना असे संबोधले आहे) पूर्वीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामधील पारेषण उपक्रमातील भाग असलेले उपक्रम, ज्यांचे विवरण त्या अधिसूचनेच्या परिशिष्ट अ मध्ये दिले आहे. ६ जून २००५ पासून महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड मध्ये हस्तांतरीत झाले. या हस्तांतरणामुळे ₹ २६,९५,९९,२०,४५५/- (दायित्वापेक्षा मालमत्ता जास्त असल्यामुळे) दर्शनी किंमत असलेले समभाग म.रा.वि.मं. सुत्रधार कंपनीच्या नावे वाटप करावयाचे होते (यानंतर सुत्रधार कंपनी असा उल्लेख करण्यात येईल) भाग निलंबित खाली समभागांचे विवरण प्रलंबित असल्यामुळे दाखविले आहे. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| | ब) वरील हस्तांतर योजने अंतर्गत मालमत्ता व दायित्वे कंपनीला ६ जून २००५ पासून हस्तांतरीत केलेली आहे. जे राज्य शासनाच्या अंतिम मान्यतेच्या अधिन आहे अशी अधिसूचना राज्य शासनाने अद्याप अधिसूचित करावयाची आहे. अधिसूनेमध्ये अशा रक्कमामध्ये काही बदल झाल्यास त्याचा परिणाम वित्तीय विवरणावर होईल. | यासंबंधी ऊर्जा सचिवांनी व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.मं. होल्डींग कंपनीला पाठविलेले पत्र क्र. रिफॉर्म-२००६/सीआर-५११/एनआरजी-३ ता. २-६-२००६ नुसार ४-६-२००५ ला शासनाने अधिसूचित केलेली तात्पुरती हस्तांतरण योजना अंतिम आदेश येईपर्यंत ५ जून २००६ नंतरही चालू राहील असे कळविले आहे. |
| ५. | सुत्रधार कंपनी व तिच्या दुय्यम कंपन्यांचा, सुरक्षित कर्जे, असुरक्षित कर्जे, किरकोळ धनको, किरकोळ ऋणको, कर्जे व अग्रीम, अंतर्गत युनिट मधील शिल्लकी याचा ताळमेळ समायोजन करताना होणाऱ्या बदलावर अवलंबून आहे. समायोजन करताना कराव्या लागणाऱ्या बदलामुळे जुने हिशेब पुरे करताना वसूल न होणारा येणी किंवा अर्धवट वसुली झाल्यामुळे होणारा संभाव्य तोटा निश्चित करता आलेला नाही. त्याचा ताळेबंदात दाखवलेला नफ्यावरील परिणाम निश्चित करता आला नाही. | सुत्रधार कंपनी व तिच्या दुय्यम कंपन्याचा सुरक्षित कर्जे, असुरक्षित कर्जे आणि अग्रीम आणि इतर येणे, देणी यासंबंधीत आर्थिक संस्था, बँका आणि कंपन्या यांना विचारणा करण्यात आलेली आहे. म्हणजे आय.ई.सी., पी.एफ.सी., एल.आय.सी., बँक ऑफ महाराष्ट्र आणि सुत्रधार कंपनी, वितरण कंपनी, निर्मिती कंपनी यापैकी आर.ई.सी., एल.आय.सी., बँक ऑफ महाराष्ट्र आणि ज्ञापका हयांच्याकडून |

| | | |
|---|---|---|
| | | संमती मिळाली आहे.<br>किरकोळ ऋणको कडून येणे असल्याची संमती मिळाली आहे. त्यापैकी बराचसा भाग पारेषण आकारासंबंधी आहे. ₹ ११४.७८ कोटी राज्य पारेषण उपयुक्तता यांच्याकडून एप्रिल २०१० मध्ये वसूल करण्यात आले. |
| ६. | लेखा परिक्षक वाणिज्य यांच्या दिनांक ३ सप्टेंबर २०१० च्या पत्रान्वये उपविभाग ६१९ (३) (अ) निर्देशीत केलेल्या सुचनेला आमचा अभिप्राय जोडपत्र (२) मध्ये निर्देशीत केलेले आहे. | काही नाही |
| ७. | वरील परिच्छेत ४ ते ५ मध्ये उल्लेखलेल्या परिशिष्टातील आमच्या निरीक्षणांना अनुसरुन आम्ही असा अहवाल देतो की, | |
| अ) | वरील परिच्छेद ४ ब आणि ५ मधील आमच्या निरीक्षणांची नोंद घेऊन जी आमच्या सर्वक्षेक्षक दृष्टीने आणि विश्वासानुसार आमच्या हिशोब तपासणीसाठी जरुर होती अशी सर्व माहिती व स्पष्टीकरणे मिळाली आहेत. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| ब) | आमच्या मते कंपनीची लेखा पुस्तके कायद्यातील तरतुदीनुसार योग्य अशी आहेत हे आमच्या तपासणी दरम्यान उघड, जेवढे आढळले त्यावरुन सांगु शकतो. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| क) | या अहवालामध्ये उल्लेख केलेल्या ताळेबंदाचा व नफा तोटा पत्रकाचा लेखा पुस्तकाशी ताळमेळ आहे. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| ड) | आमच्या मते ताळेबंद व नफा तोटा कंपनी कायदा १९५६ मधील कलम २११ उपकलम ३ क या मध्ये उल्लेखलेल्या लेखांकन मानकाच्यानुसार आहेत. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| इ) | भारत सरकारने जारी केलेल्या अधिसूचना नंबर जीएसआर ८२९ (इ) ता. २१-१०-२००३ अनुसार कंपनी कायदा १९५६ कलम २७४ (१) (ग) च्या तरतुदी कंपनीला लागू नाहीत. | वस्तुस्थितीस धरुन आहे |

| | | |
|---|---|---|
| फ) | वरील परिच्छेद ४ (ब) आणि ५ वर आमचे शेरे, ज्यामुळे वित्तीय विवरणावर होणाऱ्या परिणामाचे मोजमाप केलेले नाही, या सापेक्ष आमच्या मते आणि जरुर असणाऱ्या आमच्या माहितीनुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार ही लेखा पत्रके ज्यांचे लेखा विवरण पत्र / निती आणि लेख्यावरील टिप्पणी जे दोन्ही लेख्याचेच भाग आहेत यांचा एकत्र विचार केल्यानंतर कंपनी कायदा १९५६ प्रमाणे आवश्यक माहिती आवश्यक असलेल्या पद्धतीप्रमाणे देतात आणि खालील बाबी संबंध सत्य व उचित परिस्थिती दर्शवितात. | |
| १. | ताळेबंदाच्या बाबतीत ३१ मार्च २०१० रोजी कंपनीची स्थिती दर्शविते. | |
| २. | नफा-तोटा पत्रकानुसार हे त्या वर्षसंपलेल्या काळात नफा दाखवितात. | |
| ३. | रोकड स्त्रोत पत्रकाबाबत त्या तारखेला त्या कालावधीचे रोखीचे स्त्रोत (रोकड प्रवाह) | वस्तुस्थितीस धरुन आहे |

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

### ३१ मार्च २०१० च्या संपलेल्या वर्षाच्या लेखापरिक्षा अहवालाच्या परिच्छेद क्र. ३ मध्ये उल्लेखलेले जोडपत्र

| | | |
|---|---|---|
| १(अ) | कंपनीने आपल्या प्रत्येक विभागामध्ये पूर्वर्च्यिा राज्य विद्युत मंडळाची (म.रा.वि.मं.) स्थावर मालमत्ता नोंदवही पुढे चालू ठेवली आहे. ही नोंद वही (यामध्ये भांडवली प्रगती पथावरील कामाची ज्यात नोद होते अशा नोंद वह्याचा समावेश आहे.) स्थावर मालमत्तेसंबंधी संपूर्ण योग्य तपशील तसेच संख्यात्मक तपशील व परिस्थिती दाखविण्यासाठी त्या अद्ययावत करणे गरजेचे आहे. | इआरपी प्रणालीची अंमलबजावणी करण्याच्या पूर्वतयारीने स्थिर मालमत्ता नोंदवहीत मत्तेचा संख्यात्मक तपशील देऊन अद्ययावत करण्याबाबतचा अभ्यास केलेला आहे व त्याची तपासणी चालू आहे. |
| १(ब) | २००६-०७ म.रा.वि.मं. सूत्रधार कंपनी मर्यादित (सूत्रधार कंपनी) या कंपनीने, म.रा.वि.पा.कंपनी या कंपनीच्या स्थिर मालमत्तेचे मुल्यांकन करण्यासाठी, बाहेरील तज्ञाची नेमणूक केली होती. या तज्ञाच्या अहवालानुसार, स्थिर मालमत्तेचे मुल्य ठरविण्यासाठी त्यापैकी ९० टक्के मालमत्तेची प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली. कंपनीने सल्लागारानी प्रत्यक्ष तपासणी केलेल्या स्थिर मालमत्तेची, कंपनीने ठेवलेल्या (वरील कलम १(अ) नुसार) स्थिर मालमत्तेची नोंदवही नोंद केलेले नाही. | म.रा.वि.पा. कंपनीने सर्व मंडळ व विभागीय कार्यालयाकडे असणाऱ्या स्थिर मालमत्ता व वरीलप्रमाणे त्याचा गोळा केला गेलेला तपशील याची प्रत्यक्ष पडताळणी करण्यासाठी तज्ञ संस्थेची नेमणूक केली आहे व उपरोक्त बाबतीत निरीक्षणाअंती बनलेल्या मतांचा अहवाल अद्याप अपेक्षित आहे. |
| १(क) | कंपनीची एकूण स्थिर मालमत्ता लक्षात घेता या कालावधीत, निकालात काढलेली स्थावर मालमत्ता ही कंपनीच्या एकूण मालमत्तेवरील भरीव भाग नसल्यामुळे आमच्या मते, त्याचा कंपनीच्या स्थितीवर काहीही परिणाम होणार नाही. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| २(अ) | आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व सादर केलेल्या अहवालानुसार व्यवस्थापनाने मार्च २०१० मध्ये तीन भांडार मंडळे, पाच भांडाराची ठिकाणी व फॅब्रिकेशन वर्कशॉप मधील वस्तुसूचीची प्रत्यक्ष तपासणी केली. | वस्तुस्थितीस धरुन आहे |

| | | |
|---|---|---|
| २(ब) | आमच्या मतानुसार, व्यवस्थापनाने, अमलात आणलेली, वस्तूसूचींच्या प्रत्यक्ष तपासणीची पद्धत कंपनीचे आकारमान व तिच्या व्यवसायाचे स्वरुप पाहता, पुरेशी आहे. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| २(क) | आमच्याकडे दिलेल्या वस्तुसूचीचे आम्ही चाचणी दाखल परिक्षण केले. त्याआधारे आमच्या मते कंपनीने वस्तुसूचीचे व्यवस्थित अभिलेख ठेवलेले आहेत. सामानाची प्रत्यक्ष तपासणी व सामानाची नोंद या मधील त्रुटी कंपनी संचालनाची एकूण व्याप्ती पाहता महत्त्वाचे नाहीत असे आम्हाला स्पष्टीकरण देण्यात आले. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| ३ | आम्ही जे अभिलेख तपासले त्यानुसार कंपनी कायदा १९५६ कलम ३०१ नुसार तयार केलेल्या रजिस्टर मध्ये नोंद असलेल्या कंपन्या, संस्था व इतर संस्थाकडून कर्ज घेतलेले किंवा दिलेले नाही. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| ४ | आमच्या मते व आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, कंपनीचा आकार व व्यवसायाच्या स्वरुपाच्या प्रमाणात, स्थिर मालमत्तेच्या व सामानाच्या खरेदीचे लेखांकन करण्यासाठी अंतर्गत नियंत्रण कार्यप्रणाली मजबूत करणे आवश्यक आहे. तसेच आम्ही केलेली तपासणी व आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार वर सांगितलेल्या अंतर्गत नियंत्रण प्रणाली कमकुवत किंवा तिला सातत्याने अपयश आलेले दिसले नाही. | म.रा.वि.पा.कं मर्यादितने यापूर्वीच इ.आर.पी. व सॅप प्रणालीची सुरुवात केली असून ती अंतर्गत नियंत्रण प्रणालीची काळजी घेण्याचा प्रयत्न करीत आहे. |
| ५ | आम्हाला दिलेल्या माहितीप्रमाणे व स्पष्टीकरणे कंपनी अधिनियम १९५६, कलम ३०१ नुसार ठेवलेल्या नोंदवहीत नोंद करणे आवश्यक आहेत असे करारनामे दुसऱ्या कंपनीबरोबर किंवा इतर कोणाबरोबर केलेले नाहीत. म्हणून खंड ४(५) (अ) आणि ४(५) (ब) या वर्षासाठी कंपनीला लागू नाहीत. | वस्तुस्थितीस धरुन आहे |

| | | |
|---|---|---|
| ६ | कंपनीकडून जी माहिती व स्पष्टीकरण मिळाली त्याप्रमाणे कंपनी अधिनियम १९५६ आणि नियम यामधील कलम ५८ अ मधील तरतुदीप्रमाणे जनतेकडून ठेवी स्विकारलेल्या नाहीत. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| ७ | चालु वर्षी कंपनीने अंतर्गत लेखा परिक्षण कामासाठी बाहेरील सनदी लेखापालाच्या फर्मची नेमणूक केली. आमच्या मते व आम्ही केलेल्या विविध अंतर्गत लेखा अहवालाच्या पाठपुराव्यास अनुसरुन लेख्यामध्ये अधिक अचूकता येण्यासाठी अंतर्गत लेखा परिक्षकांनी कंपनीचे आकारमान व व्यवसायाचे स्वरुप लक्षात घेऊन आतापर्यंत अंगीकारलेल्या लेखापरिक्षणाची पध्दत व व्याप्ती यात सुधारणा करणे आवश्यक आहे. | कंपनीचे आकारमान व व्यवसायाचे स्वरुप लक्षात घेऊन अंतर्गत लेखापरिक्षकांची कार्यप्रणाली व व्याप्ती यात सुयोग्य सुधारणा करण्यात येईल. |
| ८ | आम्हाला जे अभिलेखे देण्यात आले त्यानुसार प्रथमदर्शनी आमचे असे मत झाले आहे की केंद्र सरकारने कायद्यातील कलम २०९ (१) (ड) खाली विहीत केलेल्या नमुन्याप्रमाणे मुल्याचे अभिलेखे व लेखे कंपनीने बनविले आहेत तथापि या अभिलेख्याचे व लेख्याचे सविस्तर परिक्षण आम्ही करणे गरजेचे नाही व तसे परिक्षण आम्ही केलेले नाही. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| ९(अ) | आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणाप्रमाणे तसेच आम्ही तपासणी केलेली पुस्तके व अभिलेखानुसार कंपनीने मुळातून वजावट केलेला कर ₹ २५४१००३.०० व वर्क कॉन्ट्रॅक्ट टॅक्स ₹ ७६४४१५.०० वगळता इतर निर्विवाद स्वरुपाची देणी जसे भविष्य निर्वाह निधी इन्व्हेस्टर एज्युकेशन व प्रोटेक्शन फंड, विक्री कर, संपत्तीकर, सेवाकर, जकातकर, सीमाशुल्क, जमीनीवरील शुल्क इ. सर्वसाधारणरित्या नियमितपणे योग्य त्या प्राधिकाऱ्याकडे भरणा केलेला दिसत आहे. | म.रा.वि.पारेषण कंपनीने नियमतीपणे व देय तारखेस मुळातून वजावट केलेला कर व वर्क कॉन्ट्रॅक्ट टॅक्स प्रदान केलेला आहे. तथापि लवकरच त्याचे समायोजन करण्यात येईल. |
| ९(ब) | ₹ ७०१ कोटी रकमेची विवादीत वैधानिक देणी की जी, | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | विवादीत कारणास्तव यांग्य अधिकारी मंडळाकडे आहेत अशांचा तपशिल खालील प्रमाणे आहे. | | | | | | |
| | अ.क्र. | संस्थेचे नाव | देय रकमेचे स्वरुप | रक्कम (₹ कोटी) रक्कम | कुठल्या कालावधीकरिता आहे | विवादीत देणी बाकी असलेल्या न्याय संस्थेचे नांव | |
| | १ | कामगार राज्य विमा कायदा १९४८ | कामगार राज्य विमा | ०.२२ | वित्तीय वर्ष पासून (६८-९६) विविध वर्षे | कामगार राज्य विमा न्यायालय पुणे. | सदरची बाब पुर्वच्यिा म.रा.वि. मंडळाअंतर्गत असलेल्या पुणे शहर विभागाशी संबंधीत कामगार राज्य विमा योजना लागु करण्याच्या व्यवहार्यतेसंबंधात आहे. सदरची रक्कम पुणे शहर विभागाने, ग्रहणकेंद्र (सं. व सु.) विभाग पुणे कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे त्या कार्यालयास पाठविली आहे. राज्य कामगार विमा मंडळाने सन २००६ मध्ये कामगार राज्य विमा मंडळ नयायालय पुणे यांनी म.रा.वी.मंडळाच्या बाजुने दिलेल्या निकालाविरोधात उच्च न्यायालय मुंबई येथे दाद मागितलेली आहे. सध्या ही बाब मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबीत आहे. |
| | २ | आयकर कायदा १९६१ | आयकर | ४४.१६ | कर निर्धारण वर्ष (२००८-०९) | उप-आयुक्त आयकर यांच्याकडे कलम १५४ अंतर्गत दुरुस्ती अपील दाखल | कंपनीने वित्तीय वर्ष २००५-०६ व २००६-०७ वर्षामध्ये प्रदान केलेली एमएटी जमा रक्कम ₹ ५१.०५ कोटी व त्याव्यतिरीक्त ₹ ५.९० कोटीच्या मुळातुन वजावट केलेल्या लहानशा रकमेचा विचार आयकर खात्याने नोव्हेंबर २००९ मध्ये केलेला नाही. पर्यायाने ₹ १४.९७ कोटीचे जास्तीचे व्याज आकारले गेलेले आहे. म्हणून म.रा.वि.पा. कंपनीने एप्रील-२०१० मध्ये दुरुस्तीपत्र दाखल केलेले आहे. परंतु आयकर खात्याने जुन-२०१० मध्ये ते अंशत: मान्य करुन मागणीची रक्कम ₹ ३८.८५ कोटीपर्यंत खाली आणली आहे. त्यामुळे म.रा.वि. पारेषण कंपनीने ऑगस्ट- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | २०१० मध्ये आयुक्त आयकर खाते (अ) यांच्याकडे उपरोक्त आदेशाविरोधात दाद मागितलेली आहे व ती अद्याप प्रलंबीत आहे. |
| | ३* | मध्यवर्ती मंडळ अबकारी कर व जकात खाते | सेवाकर | ६५७.०६ | वित्तीय वर्ष (२००५-०६) ते (२००९-१०) पर्यंत विविध वर्षे | आयुक्त सेवाकर मुंबई. | सेवाकर सुचनापत्र क्र. ११/२०१० दि.२७ फेब्रूवारी २०१० व ४५/२०१० दि. २० जुलै-२०१० नुसार विद्युत पारेषण कार्यक्षेत्रा सेवा कर देण्यापासून सुट देण्यात आली आहे. डी.जी.सी.ई.आय कार्यालयाकडून पारेषण कंपनीला वीजेचे पारेषण हे कार्यक्षेत्र "व्यवसाय सहाय्यभुत सेवा" अंतर्गत सेवाकर देण्यास पात्र ठरत असल्याचे विचारात घेऊन माहे २००६ ते ऑक्टोबर-२००९ पर्यंतच्या कालावधीत फेब्रूवारी-२००९ पर्यंत १२% दराने व मार्च-२००९ पासून पुढे १०% दराने सेवा कर भरण्याविषयी माहे मार्च-२०१० मध्ये ₹ ६५७.०६ कोटीचे कारणे दाखवा तथा मागणीपत्र पाठविण्यात आले होते. उत्तरादाखल म.रा.वी.पा. कंपनीने उपरोक्त कार्यालयास सदरचे कार्यक्षेत्र व्यवसाय सहाय्यभुत सेवेअंतर्गत येत नसल्याबद्दल २९ मे-२००९ रोजी कळविले होते. त्यानंतर सेवा कर प्राधिका-याकडून उपरोक्त सुचनापत्र कंपनीस लागु होत असल्याबद्दलचा सविस्तर तपशील व कागदपत्रे सादर करण्याबाबतच्या सुचना देण्यात आल्या होत्या. सदरच्या बाबीची सुनावणी दि. १४ सप्टेंबर २०१० रोजी सेवाकर आयुक्तासमोर झाली होती. व त्यांनी त्यांचा आदेश दि. १७.९.१० नुसार (दि. २३.९.१० रोजी प्राप्त) उपरोक्त मागणीपत्राद्वारे मागणी केलेली सेवा कराची मागणी रद्द केलेली आहे. |
| | | एकूण | | ₹७०१.४४ | | | |
| | *तथापि सुचनापत्र क्र.४५/ २०१० एस.टी. दि.२२.७.१०नुसार वीज वहनाच्या सेवेसाठी सेवा कर लागु नाही. तरी परंतु तशा आशयाचा आदेश अद्यापी आयुक्ताकडून काढण्यात आलेला नाही. | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| १० | ३१ मार्च २०१० रोजी कंपनीच्या नांवे संचित तोटा दिसत नाही. तसेच याच दिवशी संपणाऱ्या आर्थिक वर्षात किंवा या आर्थिक वर्षाच्या आधीच्या लगतच्या कालावधीत कंपनीला रोकडीच्या रुपात नुकसान झालेले दिसत नाही. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| ११ | आम्हाला देण्यात आलेल्या माहिती व खुलाशा वरुन या वर्षात बँका, वित्तीय संस्था आणि कर्ज रोखे धारकांच्या देय रकमांची परतफेड करण्यात कंपनीने कसूर केलेली नाही. असे आमचे मत आहे. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| १२ | आम्हाला देण्यात आलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार कंपनीने समभाग, कर्जरोखे किंवा इतर प्रतिभूती तारणावर कोणत्याही प्रकारची कर्जे किंवा अग्रीमे मंजूर केलेली नाहीत. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| १३ | कंपनी ही चीट फंड कंपनी नाही किंवा निधी/ म्युच्युअल बेनीफिट फंड/ सोसायटी नसल्यामुळे आदेशामधील कलम ४(१३) कंपनीला लागू नाही. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| १४ | आम्हाला देण्यात आलेल्या माहिती व स्पष्टीकरणाच्या आधारे आमचे असे मत आहे की प्रतिभूती च्या संदर्भात कंपनी विक्रेता किंवा व्यवसायी नाही. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| १५ | आम्हाला देण्यात आलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार बँका किंवा वित्तीय संस्था यांच्याकडून इतरानी घेतलेल्या कर्जासाठी कंपनीने कोणतीही हमी दिलेली नाही. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| १६ | आमच्या मते आणि आम्हाला देण्यात आलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार कंपनीच्या ताळेबंदाच्या सर्वसाधारण परिक्षणाप्रमाणे कंपनीने घेतलेली मुदतीची कर्जे ज्या कारणासाठी घेतली त्याच कारणासाठी वापरली आहेत असे प्रथम दर्शनी दिसत आहे. | वस्तुस्थितीस धरुन आहे |

| | | |
|---|---|---|
| १७ | आम्हाला देण्यात आलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आमच्या मते कंपनीने अल्प मुदतीसाठी उभारलेल्या कर्जाचा विनियोग दीर्घ मुदतीच्या गुंतवणुकीसाठी केलेला नाही. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| १८ | ३१ मार्च २०१० रोजी संपलेल्या वर्षात कंपनीने कोणालाही अधिक पसंती दाखवून भागाचे वाटप केलेले नाही. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| १९ | कंपनीने कोणतेही कर्ज रोखे काढले नाहीत त्यामुळे कर्ज रोख्याच्या हमी पत्राचा प्रश्न उद्भवत नाही. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| २० | आमच्या अहवालाच्या वर्षामध्ये पैसा उभारण्यासाठी कंपनीने भागाची विक्री केलेली नाही. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| २१ | भारतामध्ये सर्वसामान्यपणे मान्य असलेल्या लेखा परिक्षण पद्धतीनुसार आम्ही कंपनीच्या पुस्तकांचे व अभिलेख्यांचे परिक्षण करीत असताना तसेच आम्हाला देण्यात आलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणावरुन या वर्षामध्ये कंपनीने कोणाची फसवणूक केल्याची किंवा कंपनीची कोणाकडून फसवणूक झाल्याचे आढळत नाही. | वस्तुस्थितीस धरुन आहे |

**आमच्या सोबत जोडलेल्या अहवालानुसार**
**शहा आणि टापडिया**
सनदी लेखापाल
सभासद क्र. १०९४६३डब्ल्यु.

**राकेश जोशी**
भागीदार
सभासद क्र. १०२८८०

ठिकाण : मुंबई
दिनांक : २३/०९/२०१०

**महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी मर्यादित करीता**

**सही**
**दत्तात्रय व्हावळ**
संचालक (वित्त) प्रभारी
मुंबई

# संचालकांचा अहवाल २००९-१० ला पुरवणी तक्ता

## दिनांक ३१ मार्च २०१० या वर्षाअखेर लेखी जमाखर्चाचा हिशेब व आर्थिक बाबींच्या नोंदीवर महालेखाकार व नियामक भारत सरकार यांचे कंपनी कायदा १९५६ अंतर्गत कलम ६१९ (४) नुसार स्पष्टीकरणाचा मसुदा

कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी मर्यादित मुंबई ३१ मार्च २०१० या वर्षा अखेरीची वित्तीय विविरणपत्रे तयार करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांनी उपरोक्त अधिनियमाचे कलम ६१९ (२) अन्वये नियुक्त केलेले वैधानिक लेखा परिक्षक हे त्यांच्या व्यावसायिक संस्थेने (Institute of chartered Accounts of India) विहीत करुन दिलेल्या लेखापरिक्षण व आश्वासन मानकाप्रमाणे स्वतंत्र लेखापरिक्षेच्या आधारे उपरोक्त अधिनियमाचे कलम २२७ खाली सदर वित्तीय विवरणपत्रावर भाष्य व्यक्त करण्यास जबाबदार असतात. त्या प्रमाणे त्यांनी व्यक्त केले असल्याचे दिनांक १४ सप्टेंबर २०१० च्या त्यांच्या लेखापरिक्षण अहवालावरुन दिसून येते.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या वतीने मी कंपनी अधिनियम, १९५६ चे कलम ६१९ (३) (ब) नुसार महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (मुंबई) याचा ३१ मार्च २०१० वर्षा अखेरीचे वित्तीय विवरण पत्राची पुरवणी लेखापरिक्षा केली आहे. ही पुरवणी लेखापरिक्षा, वैधानिक लेखापरिक्षकाची कागदपत्रे न वाचता स्वतंत्रपणे केलेली आहे आणि मुख्यत: वैधानिक लेखापरिक्षक व कंपनीचे कर्मचारी यांनी केलेल्या तपासण्या आणि काही लेखांकन नोंदीची निवडक तपासणी यापुरती ती सीमित आहे. मी केलेल्या पुरवणी लेखापरिक्षेच्या आधारे, माझ्या निदर्शनास आलेल्या आणि माझ्या मते, वित्तीय विवरण पत्रे व संबंधित लेखापरिक्षण अहवाल अधिक चांगल्या रितीने समजून घेणे शक्य व्हावे म्हणून वरील अधिनियमाचे कलम ६१९ (४) नुसार आवश्यक असल्याप्रमाणे खालील महत्वाच्या बाबी निदर्शनास आणीत आहे.

**अ-**
**फायद्यावरील भाष्य**
**नफा तोटा पत्रक**
**उत्पन्न :**
**संचलनातून मिळालेला महसूल**
**(अनुसूची-१२) ` १५९९.७३ कोटी**
**मुक्त प्रवेश आकार : ` १०८.३६ कोटी**

१. उपरोक्त रकमेत २००९-१० वित्तीय वर्षासाठी लागु असलेल्या परंतु राज्य भार प्रेषण केंद्र कळवा यांच्याकडे २०१०-११ मध्ये जमा झालेल्या ₹ ८९.१७ कोटी मुक्त प्रवेश आकार रकमेचा समावेश नाही. सदरच्या रकमेचे लेखांकन न झाल्यामुळे उत्पन्न येणे व नफा ₹ ८९.१७ कोटी रकमेने कमी दाखविला गेला आहे.

**इतर उत्पन्न (अनुसूची १३)**
₹ **१०८.३७ कोटी-**
**इतर संकीर्ण जमा** ₹ **६७.९७ कोटी**

२ या रकमेमध्ये कामाच्या पुर्ततेसाठी मिळालेल्या ₹ ३.०९ कोटी रकमेचा समावेश आहे. कामाच्या अंमलबजावणीसाठी

मिळालेल्या ठेवीचे लेखांकन महसूली जमेपोटी करण्याऐवजी चालू दायित्व म्हणून करणे आवश्यक होते. परंतु ठेवीपोटी मिळालेल्या रकमेचा समावेश महसुली जमापोटी केल्यामुळे उत्पन्न व नफा जास्तीचा दिसतो व चालू दायित्व ₹ ३.०९ कोटीने कमी दिसते.

३. यामध्ये छत्रपती शाहु सहकारी साखर कारखान्याद्वारे उसाच्या चिपाडाद्वारे सहविजनिर्मिती यंत्र संचालून उत्पादलेल्या उर्जेच्या वहनाकरिता परत करण्याजोगी ठेव म्हणून मिळालेल्या ₹ १.२८ कोटीचा समावेश आहे. परत करावयाच्या ठेवीच्या रकमेचा समावेश महसुली जमा म्हणून दाखविल्याने उत्पन्न व जमा रक्कम जास्तीची दिसते व स्थिर मालमत्ता ₹ १.२८ कोटीने कमी दिसते

४. तसेच मंडळ कार्यालयास कळवा येथील यंत्रसंचास अधिक ऊर्जा पुरवण्यासाठी सिमेन्स लिमिटेड कडून १५% निरीक्षण शुल्कासह ना परतावा ठेव म्हणून अऊदा बां. मंडळ कळवा कार्यालयास ₹ १.२५ कोटी मिळाले होते. मंडळ कार्यालयाने सदरील रकमेपैकी ₹ ०.१६ कोटी निरीक्षण शुल्क खात्यापोटी जमा करण्याऐवजी संपुर्ण रक्कम ₹ १.२५ कोटी इतर उत्पन्न खात्यामध्ये जमा दाखविली. इतर उत्पन्न खात्यापोटी जमा करण्यात आल्यामुळे उत्पन्न, नफा व स्थिर मालमत्ता मुल्य अनुक्रमे (₹ १.२५ कोटी वजा ₹ ०.१६ कोटी) ₹ १.०९ कोटी ने अधिक दिसते.

५. ₹ २९.४८ लाख या रकमेत टी एस विंड पॉवर डेव्हलपर (₹ १४.७४ लाख) आणि वडुज औंध विंड फार्म इन्फ्रास्टक्चर डेव्हलपर (₹ १४.७४ लाख) ह्यांच्याकडून कामाच्या पूर्ततेसाठी मिळालेल्या रकमेचा समावेश आहे. सदरचे काम पूर्ण झालेले आहे व ठेवीचे भांडवलीकरणाशी समायोजन न करता भांडवलीकरण करण्यात आले आहे. ठेव म्हणून मिळालेली रक्कम उत्पन्न म्हणून दाखविणे व तसेच ठेवीचे स्थिर मालमत्तेबरोबर समायोजन न केले गेल्यामुळे उत्पन्न व स्थिर मालमत्तेचे मुल्य ₹ २९.४८ लाखाने जास्तीचे दिसण्यात झाला आहे.

६ हयामध्ये कामाच्या पुर्ततेसाठी निरीक्षण शुल्क म्हणून मिळालेल्या ₹ ८४.५० लाख रकमेचा समावेश नाही. महसुली जमा रक्कमेचा समावेश चालु दायित्वमध्ये केल्यामुळे इतर उत्पन्न, नफा कमी दिसण्यात व चालु दायित्वे तितक्याच रकमेने जास्त दिसण्यात झाला आहे.

७ हया मध्ये मे. रिलायबल फॅशन्स प्रायव्हेट लिमीटेड यांच्याकडून मिळालेल्या ₹ २१.५० लाख व मिनिस्ट्री ऑफ शिपींग रोड ट्रान्सपोर्ट आणि हायवे प्रोजेक्ट इंप्लिमेंटेशन युनीट नासिक हयाच्याकडून ₹ १२.५१ लाख रक्कमेचा समावेश नाही. निरीक्षण शुल्क म्हणून मिळालेली रक्कम उत्पन्न खात्यामध्ये जमा दाखविण्याऐवजी ठेव म्हणून जमा दाखविल्यामुळे ठेवीची रक्कम जास्ती दिसण्यात व उत्पन्न व नफा हा ₹ ३४.०१ लाखाने कमी दिसण्यात झाला आहे.

**खर्च –**

**कामकाजासाठी खर्च (अनुसूची-१४)**

**` ३०४.३३ कोटी दुरुस्ती व निगराणीचा संयत्र व यंत्रसामुग्रीवरील खर्च**

**` २४४.३० कोटी.**

८. उपरोक्त रकमेमध्ये मे. आदित्य विद्युत ॲप्लायन्सेस लिमीटेड कंपनीला सध्या अस्तित्वात असलेल्या ५० एम.व्ही.ए. २२०/१३२ के.व्ही. भेल बनावटीच्या २ ट्रान्सफॉर्मरचे (२२० के.व्ही. तारापुर सब स्टेशन) रुपांतर २२०/१३२/२२ के.व्ही. मध्ये करण्यासाठी देण्यात आलेल्या ₹ १.४६ कोटी रकमेचा समावेश नाही. सदरचा खर्च मंडळ कार्यालयाने अ.उ.दा.

बांधकाम मंडळ, कळवा ह्यांच्याकडे वर्ग केला आहे व कळवा, मंडल कार्यालयाने वरील खर्च महसूल खर्च शिर्षकाअंतर्गत खर्च दाखविण्याऐवजी चुकीने त्याचे भांडवलीकरण केलेले आहे. परिणाम स्वरुप एकूण खर्च कमी दिसण्यात आणि नफा व स्थिर मत्ता ₹ १.४६ कोटीने अधिक दिसण्यात झाला आहे.

**प्रशासन आणि इतर खर्च (अनुसूची १६) :**
₹ **१०३.४४ कोटी**

९. या मध्ये ४०० के.व्ही. सब स्टेशन कळव्याचे माहे एप्रिल -२०१० ते मार्च-२०१० महिन्याचे वीज देयक ₹ ५४.०० लाख दराने (अंदाजे प्रतिमाह ₹ ४.५० लाख दराने) रुपये रकमेचा अंतर्भाव नाही. परिणाम स्वरुप खर्च, दायित्व कमी दाखविण्यात झाला आहे व तितक्याच रकमेने नफा ₹ ५४ लाखाने जास्ती दाखविण्यात झाला आहे.

१०. यामध्ये भांडवली यंत्रसामुग्रीसाठी दिलेल्या ₹ ३२.३२ लाख भांड्याचा समावेश केला आहे. भांडवली खर्चाचा समावेश महसुली खर्चात केल्याने स्थिर मालमत्तेचे मुल्य कमी दाखविण्यात खर्च जास्त दाखवण्यात आणि नफा ₹ ३२.३२ लाखाने कमी दाखवला गेलेला आहे.

११. या मध्ये वर्ष २००९-१० मध्ये स्थापीत कलेल्या ३ ट्रान्सफॉर्मरवरील ₹ ४१.३९ लाख जकात दिलेल्या खर्चाचा समावेश आहे. मालमत्ता संपादीत करण्यासाठी केलेल्या खर्चाचे ट्रान्सफार्मरच्या मुल्यासहीत भांडवली करण करणे आवश्यक होते. भांडवली खर्चाचा समावेश महसुली खर्चात केल्यामुळे महसुली खर्च वाढवण्यात व तितक्याच रकमेने स्थिर मालमत्तामुल्य व नफा कमी होण्यात झाला आहे.

**विधी व व्यवसाय फी** ₹ **५.०२ कोटी**

१२. यामध्ये प्राप्तीकर खात्यासंबंधातील १९९९-२००० ते २००६-०७ या कालावधीतील बाबींसाठी व्यावसायीक सेवा प्रदान केल्याबद्दल मे. पी.सी.हंसोटीया आणि कंपनी यांना देय असलेल्या ₹ ८.८० लाख व्यावसायीक फी चा समावेश आहे की ज्याचे लेखांकन मागील कालावधीचे खर्च लेखाशिर्षका अंतर्गत होणे आवश्यक होते. परिणामस्वरुप मागील कालावधीसाठीचा खर्च कमी व इतर व्यावसायीक फी वाढण्यात झाला आहे.

**मागील कालावधीचा खर्च (नक्त) अनुसूची १९ ` २८.७१ कोटी**

१३. कंपनीने पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन वित्त भाड्यापोटी ₹ ७० लाख भाडेपट्टा दिलेला आहे पैकी ₹ ४५.४३ लाख रक्कम कंपनीला देण्यात आली नव्हती नंतर २००९-१० मध्ये भाडेपट्टा मुद्दल रक्कम ₹ ४५.४३ लाख कंपनीला देण्यात आली. परंतु व्याजापोटी देण्यात आलेल्या ₹ २४.५८ लाख ( ₹ ७०००३१५ वजा ₹ ४५४२७१४ ) रकमेचे लेखांकन मागील कालावधीतील उत्पन्न लेखा शीर्षाखाली करावयाचे आहे. परिणामी मागील कालावधीसाठीचे उत्पन्न, येणे आणि नफा ₹ २४.५८ लाखाने कमी दिसतो.

**घसारा आणि इतर कर्जफेड**
**(अनुसूची १७) ` २९९.६२ कोटी**

१४. अऊदा सं व सु नासिक विभागाने ₹ ५८.४६ लाख घसारा आकारण्याऐवजी २००९-१० वर्षात ₹ ३७.४५ लाख घसारा याच वर्षात भांडवलीकरण झालेल्या मालमत्ता मुल्य ₹ ६३.३७ कोटी रक्कमेवर आकारले आहे. परिमाण स्वरुप घसारा रक्कम कमी दिसण्यात नफा व स्थिर मालमत्तेवरील नेट ब्लॉक ₹ २१.०१ लाखानी जास्त दाखविण्यात आला आहे.

१५. अऊदा सं व सु नासिक विभागाने मालमत्ता मुल्य ₹ १.२३ कोटी रकमेवर घसारा रक्कम ₹ १.२३ कोटी आकारलेला आहे की जो ₹ ३.०९ लाखानी जास्त आहे. (मालमत्ता मुल्याच्या ९० टक्के पेक्षा जास्त) परिणाम स्वरुप एकूण घसाऱ्याची रक्कम जास्त दिसण्यात आणि स्थिर मालमत्तेवरच्या नेट ब्लॉक ची रक्कम व नफा ₹ ३.०९ लाख रुपयानी कमी दाखविण्यात आला आहे.

१६ चालु वर्षातील घसारा आकारणी सांगली विभागाने (₹ ८९.४७ लाख) कळवा विभागाने (₹ ३३.८८ लाख) कोल्हापूर विभागाने (₹ ३३.१२ लाख) व लातुर विभागाने (₹ ५.२४ लाख) इतक्या कमी रकमेने तरतूद केल्यामुळे एकूण रक्कम ₹ १.६२ कोटीने कमी दिसते. त्याचा परिणाम नेट ब्लॉक, नक्त नफा ₹ १.६२ कोटीने जास्त दिसतो.

**व्याज व वित्तीय आकार (अनुसूची १८)**
**` २०९.९९ कोटी**
**बांधिलकीचा आकार (कमीटमेंट चार्जेस)**

१७ यामध्ये पी एफ सी कर्ज क्र. २१६०३०५२ आणि २१६०३०६० साठी विहित केलेल्या अनुसूचीनुसार पॉवर फायनान्स कॉर्पोरेशनला द्यावयाच्या ₹ २.७१ लाख कमीटमेंट चार्जेसचा समावेश नाही. परिणामस्वरुप खर्च, दायित्व व नफा हा ₹ २.७१ लाखाने कमी दिसतो.

**इतर बँक चार्जेस**

१८. कंपनीने कॅनरा व सिंडीकेट बँक मधील आपले खाते बंद केले व खाते पुस्तकातील जमा नोंदीनुसार जमा असलेली शिल्लक रक्कम दुसऱ्या बँकेकडे जमा केली. कंपनीच्या रोकड वहीनुसार जमा रक्कम ₹ ०.४६ लाख आहे व ही रक्कम कंपनीने बँक चार्जेसला जमा केली आहे. बँक खाते बंद करणे व खात्यातील रक्कम इतरत्र वळवणे बाबतची कार्यवाही ही रोकड वहीतील व बँक खात्यातील नोंदीचे परस्पराबरोबर पडताळणी केल्यानंतर करणे आवश्यक होते. सदरच्या समायोजनाचा होणारा निश्चित परिणाम रिकन्सीलेशन अभावी करता येणे शक्य नाही.

**वित्तीय परिस्थितीवर भाष्य**
**ताळेबंद**
**निधीचा वापर**
**स्थिर मत्ता**
**स्थिर मत्तेचा एकूण समुदाय (अनुसूची ५) ₹ ११५६९.६५ कोटी**

१९ हया रकमेमध्ये कंपनीने म.औ.वि.महा मंडळाला अहमदनगर येथे जानेवारी १९७६ पासून ९५ वर्षाच्या भाडेपट्टी कराराने जमीन संपादित करण्यासाठी दिलेल्या ₹ ०.७० लाख भाडेपट्टी जादा रक्कम रकमेचा अंतर्भाव आहे. उपरोक्त जमीन

भाडेपट्टीकराराद्वारे संपादन केलेली असल्यामुळे जमिनीच्या कर्जफेडीची तरतूद ९५ वर्ष कालावधीत करणे आवश्यक होते. परंतु तसे न केल्यामुळे घसारा मुल्य कर्जफेड तरतूद, खर्च, तुट कमी दिसण्यात व मत्ता नक्त मुल्य समुह आणि नफा ₹ ०.२५ लाखाने जास्त दिसण्यात झाला आहे.

२०. अऊदा सं व सु विभाग नासिक विभागाने वापरात नसलेल्या मत्ता मुल्य ₹ १०.८५ कोटी त्यावरील घसारा आकारणी ₹ ९.७० कोटी मागे घेतलेली आहे. संचीत घसारा मुल्य ₹ ९.७० कोटीने मागे घेण्याऐवजी ₹ ९.४५ कोटींने मागे घेणे आवश्यक होते. परिणामस्वरुप वापरात नसलेल्या मत्ता मुल्य, संचीत घसारा मुल्य कमी दिसण्यात व नक्त स्थिर मालमत्ता समुह मुल्य ₹ २५.१५ लाखाने जास्त दिसण्यात झाला आहे.

२१. यामध्ये एलिचपूर सब स्टेशनच्या कामाच्या संदर्भात चुकीने ₹ ४.८६ कोटी रु. खर्चा टाकलेल्या रकमेचा समावेश आहे. जास्तीच्या रकमेचे भांडवलीकरण केले गेल्याने स्थिर मालमत्ता मुल्य अधिक दिसण्यात आणि प्रगतीपथावरील भांडवली कामाचे मुल्य तितक्याच रकमेने कमी दिसण्यात झाली आहे.

२२ या मध्ये १९८४-८५ पासून वापरात नसलेल्या सात वहानांचा (₹ ८.०२ लाख) व क्रेन (₹ २.६८ लाख) असे एकुण ₹ १०.७० लाख रुपयाच्या रकमेचा समावेश आहे. सदरचे वर्गकिरण वापरात नसलेल्या मत्ता शिर्षकाखाली होणे जरुरीचे होते. परिणामस्वरुप स्थिर मत्ता मुल्य वाढण्यात आणि वापरात नसलेल्या मत्तेचे मुल्य तितक्याच रकमेने कमी होण्यात झाला आहे.

२३ **दिलेला अग्रीम भाडेपटटा वित्त प्रकल्प**
**` १५३.७८ कोटी-**

हे (ILFS) कडून वित्त भाडेपट्टयाद्वारे संपादीत केलेल्या भाडेपट्टी कराराद्वारे दिल्या गेलेल्या भाड्याइतक्या समान रकमेचे दायित्व निर्माण केले गेलेल्या रकमेचे प्रतिनिधीत्व करते. कंपनीने मार्च-२०१० अखेर वित्त भाडेपट्टयाच्या दायित्वाची परतफेड केली आहे व कुठलेही वित्त भाडेपट्टयाच्या भाड्याचे दायित्व उरलेले नाही.

कंपनीने मुद्दल रकमे इतक्या वित्त भाडेपट्टीच्या भाड्याच्या रकमेची परतफेड ही दायित्व खात्याद्वारे करण्याऐवजी नफा तोटा पत्रक खात्यामधून (व्याज व वित्तीय शुल्क) व व्याज व वित्तीय शुल्क रकमेच्या मर्यादेइतक्या रकमेचे लेखांकनही नफा तोटा पत्रक खात्यामधून केलेले आहे. त्यामुळे दायित्व खाते अनिश्चीत अवस्थेत आहे. त्याच प्रमाणे भाडेपट्टीने घेतलेल्या मत्तेवर घसारा आकारणीही केली नाही. त्यामुळे मत्ता रक्कम घसारा आकारणी इतक्या रकमेने ३१/ ३/ १० रोजी जास्त दिसते. भाडेपट्टी करारपत्राप्रमाणे केलेल्या परत फेडीची रक्कम व या व्यवहाराचा नफातोटा पत्रक व ताळेबंद यावर होणारा परिणाम भाडेपट्टी कराराच्या तपशिलाअभावी निश्चित करता येत नाही.

**प्रगतीपथावरील भांडवली कामे (अनुसूची ६ )**
**` ३०९५.१४ कोटी -**

२४ पुर्नस्थापीत मत्तेच्या यामध्ये ₹ ३.३७ कोटी इतक्या विविध रकमेचा समावेश आहे. (आतील स्विचगीयरच्या जागी बाहेरील स्विचगीअर ₹ १३२ कोटी अहमदनगर व कोपरगांव सब स्टेशन येथे पुर्नस्थापित करणे) आणि ₹ ४०.२१ कोटीची एकुण ७ सबस्टेशन्स कामे औरंगाबाद विभागात दि. ३१.३.२०१० रोजी पूर्ण/ चालु करणे. परंतु चालु वर्षात त्याचे भांडवलीकरण

केलेले नाही. पूर्ण झालेल्या व कार्यान्वीत झालेल्या मत्तेचे भांडवलीकरण न केल्यामुळे प्रगतीपथावरील कामाच्या रकमेचे मूल्य जास्ती व स्थिर मालमत्तेचे मूल्य ₹ ४३.५८ कोटी रकमेने कमी दिसते.

**पुरवठा कारांना अग्रीम देणे : ` ११३.१० कोटी**

२५ यामध्ये ₹ ४.१७ कोटीचा कोल्हापूर विभागात जमा खात्यात दाखविलेल्या रकमेचा अंतर्भाव आहे. त्याचे समायोजन होणे जरुरीचे आहे.

**वापरात नसलेल्या मत्ता : ` १२.७९ कोटी –**

२६ सं. व सु. मंडल कराड ने ₹ १.७६ कोटी वापरात नसलेल्या मत्ता म्हणून दाखविल्या आहेत म्हणजेच वापरात नसलेल्या स्थिर मत्तेचा नक्त समुह तथापि गणनेप्रमाणे वापरात नसलेल्या नक्त मत्ता समुह मुल्य ₹ १.६० कोटी होते. गणन चुकीमुळे वापरात नसलेल्या मत्ता मुल्य अधिक व नक्त स्थिर मत्ता मुल्य ₹ १६.१९ लाखाने कमी दिसते

**चालु मत्ता कर्ज आणि अग्रीम ( अनुसूची–८) :**
**₹ १३८१.५८ कोटी वस्तुसूची (मालसाठा) ₹ २९८.९९ कोटी**

२७ यामध्ये भांडारात मिळालेल्या सामुग्रीचा आणि दि. २९.३.१० पर्यंतच्या तपासणी अधीन असलेल्या परंतु भांडारात प्राप्त झालेल्याची नोंद (S. R. Note) न बनविल्यामुळे वार्षिक लेख्यामध्ये लेखांकन न झालेल्या रक्कम ₹ २४५६.७८ लाख चा समावेश नाही परिणामस्वरुप तपासणी बाकी असलेल्या सामुग्री साठ्याचे (भांडवली) मूल्य ₹ २४५६.७८ लाखाने कमी दिसण्यात तसेच दायित्व तितक्याच रकमेने कमी दिसण्यात झाले आहे.

२८ यामध्ये मे. मॉडर्न इन्स्ट्रूमेंटस प्रायव्हेट लिमीटेड यांनी पुरवठा केलेल्या सदोष / नाकारलेल्या ₹ ७४.०२ लाख किमतीचा ७६.०५९ किलोमीटर ०.२ असीएसआर पँथर संवाहकाच्या किमतीचा साठ्यात समावेश केल्यामुळे साठा मुल्यात जास्तीची वाढ व खर्च कमी दिसण्यात (सदोष मालाची तरतुद) तसेच नफा तिक्याच रकमेने जास्त दिसण्यात झाला आहे.

२९ यामध्ये कंपनीने मे. ॲक्टीव्ह इंजिनिअर्सच्या वतीने भरलेल्या वर्क कॉन्टॅक्ट टॅक्स रक्कम ₹ २.७२ लाखचा समावेश आहे. ५ वर्षाचा कालावधी उलटून गेलेला असताना सुध्दा सदरची रक्कम समायोजीत करता न आल्यामुळे अनिणर्ति अवस्थत आहे त्यामुळे ह्या रकमेचे वर्गकिरण बुडीत व शंकास्पद कर्ज ह्या शीर्षकाखाली होणे आवश्यक होते. परिणामस्वरुप चालू मत्ता मूल्य अधिक दिसण्यात व बुडीत व शंकास्पद कर्ज रक्कम कर्ज तितक्याच रकमेने कमी दिसण्यात व नफा ₹ २.७२ लाखानी जास्त दिसण्यात झाला आहे.

**म.रा.वी. निर्मीती कंपनीकडून प्राप्त रक्कम ₹ २९.७७ लाख –**

३० म.रा.वी.पारेषण कंपनीने रुपांतरीत न करता येण्याजोग्या आय.एफ.सी.एल यांच्या कर्जरोख्याच्या पुनर्बांधणीकरीता रक्कम ₹ २९.७७ लाख शुल्क वर्ष २००६ मध्ये दिले होते. नंतर हे कर्ज म.रा.वी.निर्मिती कंपनी कडे हस्तांतरीत करण्यात आले व पुनर्बांधणी शुल्क परत मिळण्यासाठी दावा सांगितला गेला परंतु तो निर्मिती कंपनीने अमान्य केला. परिणामस्वरुप किरकोळ येणी रक्कम जास्तीची दिसते व खर्च व नफा प्रत्येकी ₹ २९.७७ लाखाने कमी दिसतो.

**रोख व बँकेतील शिल्लक ` ३५९.०७ कोटी –**

३१ यामध्ये भांडुप विभागाने प्रदान केलेल्या व प्रदान केलेल्या व्यक्तीने बँकेत जमा न केलेल्या मुदत बाह्य धनादेश रक्कम ₹ ०.४३ लाखाचा समावेश नाही. परिणाम स्वरुप रोख व बँकेतील शिल्लक आणि दायित्वे हे ₹ ०.४३ लाखाने कमी दिसते.

**रक्कम आधी प्रदान केलेले खर्च ₹ १०.१३ कोटी –**

३२ सदरची रक्कम, दीर्घ कालावधीची कर्जे पुनर्बांधणीसाठी केलेल्या खर्चाचे व निर्लेखीत करावयाचे राहुन गेलेल्या रकमेचे प्रतिनिधीत्व करते. सदरच्या खर्चाचे स्वरुप हे स्थगीत महसुली खर्च असे असल्याने तशा प्रकारे खर्चाचे वर्गकिरण करणे आवश्यक होते.

**निधीचे स्त्रोत–**
**चालु दायित्वे आणि तरतुदी**
**चालु दायित्वे (अनुसूची–९) ` १९५५.०२ कोटी**
**इतराना देणे असलेले ` ५५२.६० कोटी**
**कामाच्या अंमलबजावणीसाठी ठेव.**

३३ अ.ऊ.दा. सं. व सु. नासिक विभागाने ₹ ५७.८५ लाख संकीर्ण जमा खात्यामध्ये जमा केले आहेत व ग्राहकाकडून थेट वर्गणी खात्यापोटी नावे केले आहेत. ही ठेव जास्तीची नसल्यामुळे संकीर्ण जमा खात्यामध्ये जमा दाखववावयास नको होते. परिणामस्वरुप उत्पन्न व नफा अधिक दिसण्यात व चालु दायित्वे ₹ ५७.८५ लाखाने कमी दिसतात

३४ यामध्ये उरमोडी धरण सब स्टेशन योजने करिता ठेव म्हणून मिळालेल्या रक्कम ₹ १.७१ लाखचा समावेश आहे. ही योजना पूर्ण झाली आहे व ३१/ ३/ १० पुर्वित्याचे भांडवलीकरणही झाले आहे तथापी ठेव रकमेचे समायोजन केले गेलेले नाही. स्थिर मत्तेशी ठेवीचे समायोजन न केल्यामुळे इतर चालु दायित्वे व स्थिर मत्ता मुल्य तितक्याच रकमेने जास्तीचे दिसते.

**ग्राहकाचे अनुदान : ₹ ४८४.४३ कोटी –**

३५ यामध्ये निवळीफाटा सब स्टेशन योजनेसाठी २००७–०८ व २००८–०९ वर्षामध्ये मिळालेल्या रक्कम ₹ ४.८२ कोटी अनुदानाचा समावेश आहे आणि ३१–३–२०१० पूर्वाजी ११ कामे पूर्ण झाली कार्यान्वीत झाली ती ₹ ७.४३ कोटी तथापि मिळालेल्या अनुदानाचे समायोजन स्थिर मालमत्तेबरोबर केलेले नाही. अनुदान समायोजनेअभावी अनुदान खात्यातील व स्थिर मालमत्तेची किंमत वरील रकमेने जास्ती दिसते.

**पुरवठाकाराकडून / कंत्राटदाराकडून ठेऊन घेतलेली रक्कम–**

३६ यामध्ये पनवेल विभागाने मार्च–२०१० अखेरपर्यंत पुरवठाकार कंत्राटदार यांच्या बिलामधुन ठेऊन घेतलेल्या रक्कम ₹ ३.२० कोटीचा समावेश आहे. कंत्राटदारा नुसार/ पुरवठाकारानुसार निलंबीत नोंदणीपुस्तक ठेवलेले आहे. परंतु त्यामध्ये शिल्लक रक्कम ₹ ३.४९ कोटी दाखवली आहे. रकमेतील तफावत ₹ २८.८७ लाखात ताळमेळ लावणे आवश्यक आहे.

**उपार्जित परंतु कर्जांवरील देय नसलेले व्याज ` ५४.६५ कोटी**
**खाजगी रोखे उपार्जित परंतु देय नसलेले व्याज ` १४.८८ कोटी–**

३७ हे अगोदरच्या वर्षात तरतुद केलेल्या रोख्यावरील देय झालेल्या व्याजाचे प्रतिनिधीत्व करते. व्याज व वित्तीय शुल्कापोटी देय असलेली रक्कम कंपनीने वेळोवेळी जेव्हा ती देय झाली त्या त्या वेळी ती प्रदान केली आहे व संबंधीत वर्षात त्याचे लेखांकनही खर्च म्हणून केले आहे. लेखांकन करताना त्यासाठी केलेल्या ₹ १४८८.२५ लाख तरतुदीचे समायोजन केलेले नाही. परिणामस्वरुप व्याज व वित्तीय शुल्क, दायित्व यांच्या रकमेत अधिक वाढ दिसते आणि नफा ₹ १४.८८ कोटीनी कमी दिसतो.

**भारतीय चलनातील कर्ज –**
**आय.एल. व एफ.एस.मुंबई ` ०.४२ कोटी वरील उपार्जित परंतु देय नसलेले व्याज.**

३८ हे नागोठणे वडखळ ४०० के.व्ही. पारेषण वाहिनी उभारणी करण्यासाठी मे. आय.एल. व एफ. एस. मुंबई यांच्याकडून १९९६ मध्ये घेतलेल्या कर्जापोटी द्याव्या लागणा–या व्याजासाठी निर्माण केलेल्या दायित्वाचे प्रतिनिधीत्व करते. कंपनीने व्याजासहीत कर्जाचे दायित्व संपूर्णपणे फेडलेले आहे आणि म्हणून हे दायित्व मागे घेणे आवश्यक होते.
परिणामस्वरुप दायित्वाची रक्कम जास्तीची दिसते व नफा ₹ ०.४२ कोटीने कमी दिसतो.

**कर्मचा–याशी संबंधी दायित्वे व तरतुदी ` ९३.२५ कोटी नियोजित मालमत्तेमध्ये पडणा–या तुटीसंबंधी तरतुद : ` ७.९२ कोटी**

३९ कंपनीने भ.नि.नि. विश्वस्त संस्थेच्या मत्तेच्या मुल्यनिर्धारणासाठी नेमलेल्या सल्लागाराकडून प्राप्त झालेल्या मुल्यनिर्धारण अहवालास अनुसरुन ₹ ७.९२ कोटीची नियोजित मालमत्तेमध्ये पडणा–या तुटीसाठीची तरतुद केलेली आहे. परंतु अहवालाची छाननी करता असे आढळले आहे की, कंपनीने ₹ ३०३.५२ कोटीच्या उपार्जित परंतु देय नसलेल्या दि. ३१.३.१० पर्यंतच्या गुंतवणुकीवरील व्याजाचा एकुण मालमत्तेची किंमत ठरविताना विचार केला गेलेला नसल्यामुळे मुल्य निर्धारण अहवाल चुकीचा आहे. परिणाम स्वरुप मत्तेचे मुल्यनिर्धारण ₹ ३०३.५२ कोटीने कमी झालेले आहे. पर्यायाने ₹ ७.९२ कोटीची तरतुद करणे आवश्यक आहे. परिणामस्वरुप खर्च, दायित्व जास्तीचे दिसण्यात व नफा ₹ ७.९२ कोटीने कमी दिसण्यात झाला आहे.

**इतर दायित्वे व तरतुदी : ` ६.४५ कोटी**

४० यामध्ये २००९–१० वित्त वर्षासाठीच्या ₹ ५९.२० लाखाच्या दायित्वाच्या रकमेचा समावेश नाही. परिणामस्वरुप दायित्वाची रक्कम ₹ ५९.२० लाखाने कमी दिसण्यात आणि त्या अनुषंगाने स्थिर मत्ता मुल्य भांडवली प्रगती पथावरील कामे, प्रशासकीय खर्च हा अनुक्रमे ₹ ५.७८ लाख, ₹ ४८.७६ लाख आणि ₹ ४.६६ लाखाने कमी दिसण्यात झाला आहे.

४१ यामध्ये उस्मानाबाद भांडार येथे दि. २९.३.१० ते ३१.३.१० या कालावधीत प्राप्त झालेल्या ₹ ८०.३५ लाख किमतीच्या सामुग्रीचा समावेश नाही. दि. ३१.३.१० पुर्वी प्राप्त झालेल्या सामुग्रीचे लेखांकन न केले गेल्यामुळे चालु दायित्वे व साठा मुल्य उपरोक्त रकमेने कमी दिसते.

४२ या मध्ये मे. फरहट अब्बास यांना मे-२००९ मध्ये उर्जा राहित्राच्या वाहतुकीसाठी मे-२०१० मध्ये प्रदान केलेल्या ₹ ३.४६ लाखाच्या वहातुकखर्चाच्या रकमेचा समावेश नाही वहातुक खर्चाच्या रकमेचे लेखांकन न केले गेल्यामुळे इतर दायित्वे व स्थिर मत्ता मुल्य उपरोक्त रकमेइतके कमी दिसण्यात झाला आहे.

४३ यामध्ये वित्तीय वर्ष २००९-१० मधील खर्चापोटी अदत्त दायित्वाची रक्कम ₹ ६.६८ लाखाचा समावेश नाही. अदत्त दायित्वाच्या रकमेची तरतुद न केली गेल्यामुळे चालु दायित्व, खर्च व तुट ₹ ६.६८ लाखाने कमी दिसते.

**तदतुदी (अनु. १०) ` ४८४.९८ कोटी**
**रजेच्या रोखीकरणासाठी तरतुद `१७९.१७ कोटी.**

४४ यामध्ये ₹ ७.०२ लाख रजेच्या रोखीकरणापोटी कर्मचा-यांना २००९-१० मध्ये देय असलेल्या दिलेल्या परंतु २०१०-११ मध्ये प्रदान केलेल्या रकमेचा अंतर्भाव नाही. तरतुद न केल्यामुळे इतर चालू दायित्वे, खर्च कमी दिसतो व नफा ₹ ७.०२ लाखाने जास्ती दिसतो.

४५ **प्रगटीकरणावरील भाष्य - लेख्यांवर टिप्पणी**
**करआकारणी वर्ष २००७-०८ साठीचे आयकर दायित्व-**

आयकर खात्याने, कर निर्धारण वर्ष २००७-०८ साठी त्यांच्या पत्र क्र. १६ सप्टेंबर २०१० च्या मागणी पत्राद्वारे ₹ ७.४२ कोटीच्या जास्तीच्या आयकराची मागणी केली होती परंतु त्या संबंधीची कंपनीने तरतुद केली नाही. अथवा लेख्यामध्ये त्याचे प्रकटीकरणही केले नाही.

४६ **अनिश्चित दायित्व :**

मे. मायक्रो अँड स्मॉल एंटरप्रायझेस फॅसीलीटेशन कौन्सीलने म.रा.वि.पा.कं. मर्यादित यांच्या नावे, मे. मिनर्व्हा स्विचगेअरस आणि कंट्रोल्स नागपूर व सिग्मा ट्रान्सफॉर्मर्स प्रायव्हेट लिमीटेड नागपुर यांच्याकडून केलेल्या खरेदीपोटी देयक देण्यास लावलेल्या विलंबाबद्दल व्याजापोटी ₹ १.४६ कोटी व ₹ ५४.८२ लाख देण्यासाठी आदेश निर्गमीत केला होता. कंपनी जरी कायदेशीर निकालाच्या ७५ टक्के रक्कम ठेव म्हणून भरताना वरच्या कोर्टात दाद मागण्याच्या तयारीत असली तरी त्या संबंधीची तरतुद केलेली नाही व तसे लेख्यामध्ये प्रकटीकरणही केलेले नाही.

नियंत्रक व महालेखापाल परिक्षक यांच्यावतीने निर्गमित व स्वाक्षरीत

सही/-
**एस. जाफा**
महालेखाकार (वाणिज्यिक लेखापरिक्षा)

ठिकाण : मुंबई
दिनांक : ३०/१२/२०१०

# संचालकांचा अहवाल २००९-१० ला पुरवणी तक्ता

**दिनांक ३१ मार्च २०१० या वर्षाअखेर लेखी जमाखर्चाचा हिशेब व आर्थिक बाबींच्या नोंदीवर महालेखाकार व नियामक भारत सरकार यांचे कंपनी कायदा १९५६ अंतर्गत कलम ६१९ (४) नुसार स्पष्टीकरणाचा मसुदा**

| अ.क्र. | महालेखापालाचे भाष्य | म.रा.वी. पारेषण कंपनी मर्यादितचे स्पष्टीकरण |
|---|---|---|
| | कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी मर्यादित मुंबई ३१ मार्च २०१० या वर्षा अखेरीची वित्तीय विविरणपत्रे तयार करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांनी उपरोक्त अधिनियमाचे कलम ६१९ (२) अन्वये नियुक्त केलेले वैधानिक लेखा परिक्षक हे त्यांच्या व्यावसायिक संस्थेने (Institute of chartered Accounts of India) विहीत करुन दिलेल्या लेखापरिक्षण व आश्वासन मानकाप्रमाणे स्वतंत्र लेखापरिक्षेच्या आधारे उपरोक्त अधिनियमाचे कलम २२७ खाली सदर वित्तीय विवरणपत्रावर भाष्य व्यक्त करण्यास जबाबदार असतात. त्या प्रमाणे त्यांनी व्यक्त केले असल्याचे दिनांक १४ सप्टेंबर २०१० च्या त्यांच्या लेखापरिक्षण अहवालावरुन दिसून येते. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| | भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या वतीने मी कंपनी अधिनियम, १९५६ चे कलम ६१९ (३) (ब) नुसार महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (मुंबई) याचा ३१ मार्च २०१० वर्षा अखेरीचे वित्तीय विवरण पत्राची पुरवणी लेखापरिक्षा केली आहे. ही पुरवणी लेखापरिक्षा, वैधानिक लेखापरिक्षकाची कागदपत्रे न वाचता स्वतंत्रपणे केलेली आहे आणि मुख्यत: वैधानिक लेखापरिक्षक व कंपनीचे कर्मचारी यांनी केलेल्या तपासण्या आणि काही लेखांकन नोंदीची निवडक तपासणी यापुरती ती सीमित आहे. मी केलेल्या पुरवणी लेखापरिक्षेच्या आधारे, माझ्या निदर्शनास आलेल्या आणि माझ्या मते, वित्तीय विवरण पत्रे व संबंधित लेखापरिक्षण अहवाल अधिक चांगल्या रितीने समजून घेणे | वस्तुस्थितीस धरुन आहे |

| | | |
|---|---|---|
| | शक्य व्हावे म्हणून वरील अधिनियमाचे कलम ६१९ (४) नुसार आवश्यक असल्याप्रमाणे खालील महत्वाच्या बाबी निदर्शनास आणीत आहे. | |
| | **अ-**<br>**फायद्यावरील भाष्य**<br>**नफा तोटा पत्रक**<br>**उत्पन्न :**<br>**संचलनातून मिळालेला महसूल**<br>**(अनुसूची-१२) ₹ १५९९.७३ कोटी**<br>**मुक्त प्रवेश आकार : ₹ १०८.३६ कोटी** | |
| १. | उपरोक्त रकमेत २००९-१० वित्तीय वर्षासाठी लागु असलेल्या परंतु राज्य भार प्रेषण केंद्र कळवा यांच्याकडे २०१०-११ मध्ये जमा झालेल्या ₹ ८९.१७ कोटी मुक्त प्रवेश आकार रकमेचा समावेश नाही. सदरच्या रकमेचे लेखांकन न झाल्यामुळे उत्पन्न येणे व नफा ₹ ८९.१७ कोटी रकमेने कमी दाखविला गेला आहे. | ₹ ८९.१७ हि मुक्त प्रवेश आकारापोटीची रक्कम मार्च २०१० महिन्यासाठी आहे. तथापि अल्प मुदतीचे मुक्त प्रवेश आकार प्रादेशिक भार प्रेषण केंद्राकडून निश्चित करण्यात येत असल्यामुळे माहे मार्च २०१० साठीची मुक्त प्रवेश आकाराची रक्कम निश्चित करता येत नाही. परिणामस्वरुप ₹ ८९.१७ लाखाची तरतूद अल्प मुदत मुक्त प्रवेश आकार तरतूद वित्तीय वर्ष २००९-१० मध्ये करण्यात आली नाही. |
| | **इतर उत्पन्न (अनुसूची १३)**<br>**₹ १०८.३७ कोटी-**<br>**इतर संकीर्ण जमा ₹ ६७.९७ कोटी** | |
| २ | या रकमेमध्ये कामाच्या पुर्ततेसाठी मिळालेल्या ₹ ३.०९ कोटी रकमेचा समावेश आहे. कामाच्या अंमलबजावणीसाठी मिळालेल्या ठेवीचे लेखांकन महसूली जमेपोटी करण्याऐवजी चालू दायित्व म्हणून करणे आवश्यक होते. परंतु ठेवीपोटी मिळालेल्या रकमेचा समावेश महसुली जमापोटी केल्यामुळे उत्पन्न व नफा जास्तीचा दिसतो व चालू दायित्व ₹ ३.०९ कोटीने कमी दिसते. | तांत्रिक तपशीला अभावी सदरची रक्कम महसुली जमा म्हणून दाखविण्यात आली परंतु आता ती जे. व्ही क्रमांक २५ दिनांक ३०/१०/२०१० द्वारे त्यामध्ये दुरुस्ती करुन कामाच्या पुर्ततेसाठी ठेव लेखाशिर्षकांअंतर्गत सामुग्री किंमत ₹ ०.९५ कोटी दाखविण्यात आली आहे. मालमत्तेवरचा खर्च पूर्ण झाल्यावर सदरील रकमेचे समायोजन मालमत्ता भांडवली करणाबरोबर करण्यात येईल (अ. उदा. बांधकाम विभाग |

| | | |
|---|---|---|
| | | सांगली) तांत्रीक तपशिला अभावी मिरज -जाटलाईन परिवर्तनासाठी मिळालेली रक्कम ₹ ०.२९ कोटी महसुली जमा म्हणून दाखविण्यात आली. तथापि आता जे.व्ही.नं. २१ दि. ३१/१०/२०१० (अ उदा बां.वि.सांगली) द्वारे त्यात दुरुस्ती करुन साधन सामुग्रीला पुरवठ्याबद्दलचे दायित्व शिर्षकाअंतर्गत जमा दाखविण्यात आली आहे. तांत्रीक तपशिला अभावी यापुर्वी ₹ १.८४ कोटी उत्पन्न खात्याकडे जमा दाखविण्यात आले होते. परंतु त्यात आता जे.व्ही. नं. २० दि. ३१-१०-१० द्वारे दुरुस्ती करुन कामाच्या पुर्ततेसाठी ठेव खात्याअंतर्गत जमा दाखविण्यात आले आहेत. (अति उच्च दाब विभाग कोल्हापूर) |
| ३. | यामध्ये छत्रपती शाहु सहकारी साखर कारखान्याद्वारे उसाच्या चिपाडाद्वारे सहविजनिर्मिती यंत्र संचालून उत्पादलेल्या उर्जेच्या वहनाकरिता परत करण्याजोगी ठेव म्हणून मिळालेल्या ₹ १.२८ कोटीचा समावेश आहे. परत करावयाच्या ठेवीच्या रकमेचा समावेश महसुली जमा म्हणून दाखविल्याने उत्पन्न व जमा रक्कम जास्तीची दिसते व स्थिर मालमत्ता ₹ १.२८ कोटीने कमी दिसते | पुर्वी तांत्रिक तपशिला अभावी सदरची रक्कम उत्पन्नापोटी जमा दाखविण्यात आली होती. परंतु आता जे. व्ही. नं. २० दि. ३१/१०/१० द्वारे दुरुस्ती करुन कामाच्या पुर्ततेसाठी ठेव लेखाशिर्षकाअंतर्गत जमा दाखविण्यात आली आहे. (अ उदा बां.वि. कोल्हापूर) मालमत्तेचे भांडवलीकरण आता अंशत: केलेले आहे. काम पूर्ण झाल्यावर १०० टक्के भांडवलीकरण करण्यापूर्वी ना परतावा ठेवेचे समयोजन मालमत्तेच्या किंमतीबरोबर करण्यात येईल. |
| ४. | तसेच मंडळ कार्यालयास कळवा येथील यंत्रसंचास अधिक ऊर्जा पुरवण्यासाठी सिमेन्स लिमिटेड कडून १५% निरीक्षण शुल्कासह ना परतावा ठेव म्हणून अऊदा बां. मंडळ कळवा कार्यालयास ₹ १.२५ कोटी मिळाले होते. मंडळ कार्यालयाने सदरील रकमेपैकी ₹ ०.१६ कोटी निरीक्षण शुल्क खात्यापोटी जमा करण्याऐवजी संपुर्ण रक्कम ₹ १.२५ कोटी इतर उत्पन्न खात्यामध्ये जमा दाखविली. इतर उत्पन्न खात्यापोटी जमा करण्यात आल्यामुळे उत्पन्न, नफा व स्थिर मालमत्ता मुल्य अनुक्रमे ( ₹ १.२५ कोटी वजा ₹ ०.१६ कोटी) ₹ १.०९ कोटी ने अधिक दिसते. | एकूण ₹ १.२५ कोटी रकमेपैकी आता निरीक्षण शुल्कापोटी ₹ ०.१६ कोटी व कामाच्या पुर्ततेसाठी ठेव रक्कम म्हणून ₹ १.०९ व त्या रकमेचे समायोजन करण्यात आलेले आहेत. |

| | | |
|---|---|---|
| ५. | ₹ २९.४८ लाख या रकमेत टी एस विंड पॉवर डेव्हलपर (₹ १४.७४ लाख) आणि वडुज औंध विंड फार्म इन्फ्रास्टक्चर डेव्हलपर (₹ १४.७४ लाख) ह्यांच्याकडून कामाच्या पूर्ततेसाठी मिळालेल्या रकमेचा समावेश आहे. सदरचे काम पूर्ण झालेले आहे व ठेवीचे भांडवलीकरणाशी समायोजन न करता भांडवलीकरण करण्यात आले आहे. ठेव म्हणून मिळालेली रक्कम उत्पन्न म्हणून दाखविणे व तसेच ठेवीचे स्थिर मालमत्तेबरोबर समायोजन न केले गेल्यामुळे उत्पन्न व स्थिर मालमत्तेचे मुल्य ₹ २९.४८ लाखाने जास्तीचे दिसण्यात झाला आहे. | कामाच्या पुर्ततेसाठी मे. टी.एस्.विंड पॉवर डेव्हलपर व वडुज औंध फार्म इन्फ्रास्टकचर डेव्हलपर यांच्या कडून प्रत्येकी ₹ १४७४०००/- प्रमाणे एकूण ₹ २९.४८ लाख ठेव म्हणून मिळाले होते. हयाबाबतीत ठेवीचे स्थिर मालमत्तेशी समायोजन केलेले नाही. आता वित्तीय वर्ष २०१०-११ मध्ये जे.व्ही. ११/ नोव्हेंबर २०१० द्वारे त्यात दुरुस्ती केलेली आहे आणि जे.व्ही. क्र. १२/ नोव्हेंबर १० द्वारे घसारा रक्कम मागे घेतलेली आहे. |
| ६ | हयामध्ये कामाच्या पुर्ततेसाठी निरीक्षण शुल्क म्हणून मिळालेल्या ₹ ८४.५० लाख रकमेचा समावेश नाही. महसुली जमा रक्कमेचा समावेश चालु दायित्वमध्ये केल्यामुळे इतर उत्पन्न, नफा कमी दिसण्यात व चालु दायित्वे तितक्याच रकमेने जास्त दिसण्यात झाला आहे. | तांत्रीक तपशिलाअभावी पुर्वी ही रक्कम कामाच्या पुर्ततेसाठी ठेव लेखाशिर्षकाअंतर्गत जमा दाखविण्यात आली होती. परंतु त्यात आता दुरुस्ती करुन जे.व्ही.क्र. १९ दि. ३०/ १०/ १० द्वारे रक्कम ₹ ८४.५० लाख हे आधीच्या कालावधीचे उत्पन्न खात्याला जमा दाखविण्यात आले आहेत. |
| ७ | हया मध्ये मे. रिलायबल फॅशन्स प्रायव्हेट लिमीटेड यांच्याकडून मिळालेल्या ₹ २१.५० लाख व मिनिस्ट्री ऑफ शिपींग रोड ट्रान्सपोर्ट आणि हायवे प्रोजेक्ट इंप्लिमेंटेशन युनीट नासिक हयाच्याकडून मिळालेले ₹ १२.५१ लाख रक्कमेचा समावेश नाही. निरीक्षण शुल्क म्हणून मिळालेली रक्कम उत्पन्न खात्यामध्ये जमा दाखविण्याऐवजी ठेव म्हणून जमा दाखविल्यामुळे ठेवीची रक्कम जास्ती दिसण्यात व उत्पन्न व नफा हा ₹ ३४.०१ लाखाने कमी दिसण्यात झाला आहे. | निरीक्षण शुल्क म्हणून प्रत्यक्षात मिळालेली रक्कम ₹ २१.५० लाख चे लेखांकन जे.व्ही.नं. ७ दि. ३१-७-०९ द्वारे उत्पन्न म्हणून करण्यात आले आहे. ₹ १२.५१ लाख ठेव खात्याला खर्च टाकून आधीच्या कालावधीचे उत्पन्न खात्याला जे.व्ही.क्र. ६ दि. ३०/ ११/ २०१० द्वारा जमा दाखविण्यात आले आहेत. |
| | **खर्च -**<br>**कामकाजासाठी खर्च (अनुसूची-१४)**<br>₹ **३०४.३३ कोटी**<br>**दुरुस्ती व निगराणीचा संयत्र व** | |

| | | |
|---|---|---|
| | **यंत्रसामुग्रीवरील खर्च**<br>₹ **२४४.३० कोटी.** | |
| ८. | उपरोक्त रकमेमध्ये मे. आदित्य विद्युत ॲप्लायन्सेस लिमीटेड कंपनीला सध्या अस्तित्वात असलेल्या ५० एम.व्ही.ए. २२०/ १३२ के.व्ही. भेल बनावटीच्या २ ट्रान्सफॉर्मरचे (२२० के.व्ही. तारापुर सब स्टेशन) रुपांतर २२०/१३२/२२ के.व्ही. मध्ये करण्यासाठी देण्यात आलेल्या ₹१.४६ कोटी रकमेचा समावेश नाही. सदरचा खर्च मंडळ कार्यालयाने अ.उ.दा. बांधकाम मंडळ, कळवा ह्यांच्याकडे वर्ग केला आहे व कळवा, मंडल कार्यालयाने वरील खर्च महसूल खर्च शिर्षकाअंतर्गत खर्च दाखविण्याऐवजी चुकीने त्याचे भांडवलीकरण केलेले आहे. परिणाम स्वरुप एकूण खर्च कमी दिसण्यात आणि नफा व स्थिर मत्ता ₹ १.४६ कोटीने अधिक दिसण्यात झाला आहे. | ₹ १.४६ कोटीचा ट्रान्सफॉर्मर दुरुस्तीचा खर्च की जो कळवा बांधकाम मंडळाकडे वर्ग करण्यात आला होता, तो अशा योजनेवर खर्च करण्यात आला आहे की जी अद्याप अपूर्ण आहे म्हणून सदरच्या खर्चाचे लेखांकन दुरुस्ती व निगराणी शिर्षकाअंतर्गत केलेले नाही. |
| | **प्रशासन आणि इतर खर्च (अनुसूची १६) :**<br>₹ **१०३.४४ कोटी** | |
| ९. | या मध्ये ४०० के.व्ही. सब स्टेशन कळव्याचे माहे एप्रिल - २०१० ते मार्च-२०१० महिन्याचे वीज देयक ५४.०० लाख दराने (अंदाजे प्रतिमाह ₹ ४.५० लाख दराने) रुपये रकमेचा अंतर्भाव नाही. परिणाम स्वरुप खर्च, दायित्व कमी दाखविण्यात झाला आहे व तितक्याच रकमेने नफा ₹ ५४ लाखाने जास्ती दाखविण्यात झाला आहे. | चालू वर्ष २००९-१० मध्ये म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांच्याकडून वीज देयकाचे मापन (IBA) न मिळाल्यामुळे वित्तीय वर्ष २००९-१० मध्ये लेखांकन करण्याचे राहून गेले आहे. तथापि आता जे. व्ही. ने १६/ नोव्हेंबर २०१० द्वारे त्यांचे लेखांकन करण्यात आले आहे. |
| १०. | यामध्ये भांडवली यंत्रसामुग्रीसाठी दिलेल्या ₹ ३२.३२ लाख भांड्याचा समावेश केला आहे. भांडवली खर्चाचा समावेश महसुली खर्चात केल्याने स्थिर मालमत्तेचे मुल्य कमी दाखविण्यात खर्च जास्त दाखवण्यात आणि नफा ₹ ३२.३२ लाखाने कमी दाखवला गेलेला आहे. | भांडवली यंत्र सामुग्रीवर जेआयसीए योजनेसाठी देण्यात आलेले भाडे पूर्व महसुली खर्च टाकण्यात आले होते. परंतु आता जे.व्ही. नं. ८/ ३०सप्टेंबर १० द्वारा दुरुस्ती करण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| ११. | या मध्ये वर्ष २००९-१० मध्ये स्थापीत कलेल्या ३ ट्रान्सफॉर्मरवरील ₹ ४१.३९ लाख जकात दिलेल्या खर्चाचा समावेश आहे. मालमत्ता संपादीत करण्यासाठी केलेल्या खर्चाचे ट्रान्सफार्मरच्या मुल्यासहीत भांडवली करण करणे आवश्यक होते. भांडवली खर्चाचा समावेश महसुली खर्चात केल्यामुळे महसुली खर्च वाढवण्यात व तितक्याच रकमेने स्थिर मालमत्तामुल्य व नफा कमी होण्यात झाला आहे. | हा खर्च महानगरपालिका मधील उपयोगात आणण्यात आलेल्या ३ ट्रान्सफॉर्मर संबंधातील आहे. म.रा.वि.पा. कंपनीने हयासाठी ₹ ४१.३९ लाख जकाती पोटी खर्च केलेले आहेत. सदरच्या खर्चाचे भांडवलीकरण करण्यात आले नव्हते परंतु आता त्यात दुरुस्ती करण्यात आली आहे. |
| १२. | **विधी व व्यवसाय फी ` ५.०२ कोटी**<br><br>यामध्ये प्राप्तीकर खात्यासंबंधातील १९९९-२००० ते २००६-०७ या कालावधीतील बाबींसाठी व्यावसायीक सेवा प्रदान केल्याबद्दल मे. पी.सी.हंसोटीया आणि कंपनी यांना देय असलेल्या ₹ ८.८० लाख व्यावसायीक फी चा समावेश आहे की ज्याचे लेखांकन मागील कालावधीचे खर्च लेखाशिर्षका अंतर्गत होणे आवश्यक होते. परिणामस्वरुप मागील कालावधीसाठीचा खर्च कमी व इतर व्यावसायीक फी वाढण्यात झाला आहे. | पुर्वच्यिा म.रा.वि.मंडळातील सन १९९९-२०००, २०००-२००१ व कर आकारणी वर्ष २००२-०३ ते २००६-२००७ या कालावधीतील प्राप्ती करासंबंधाती बाबीसाठू सेवा प्रदान केल्याबद्दल मे. पी.सी.हंसोटीया आणि कंपनीने त्यांचे बिल दि. ३१-३-१० नुसार देय असलेल्या व्यावसायिक फी ची अशोषीत घसारा ज्या टक्केवारीत पुढे ओढण्यात आला व वारस कंपन्यानी त्यावर हक्क सांगितला त्या आधारावर दि. १५ जुलै २०१० रोजी ठरविण्यात आला म्हणून त्याचे लेखांकन (व्यवसाय फी) २००९-१० हया वर्षात करण्यात आले आहे. |
| १३. | **मागील कालावधीचा खर्च (नक्त) अनुसूची १९ ` २८.७१ कोटी**<br><br>कंपनीने पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन वित्त भाड्यापोटी ₹ ७० लाख भाडेपट्टा दिलेला आहे पैकी ₹ ४५.४३ लाख रक्कम कंपनीला देण्यात आली नव्हती नंतर २००९-१० मध्ये भाडेपट्टा मुद्दल रक्कम ₹ ४५.४३ लाख कंपनीला देण्यात आली. परंतु व्याजापोटी देण्यात आलेल्या रु. २४.५८ लाख ( ₹ ७०००३१५ वजा रु. ४५४२७१४ ) रकमेचे लेखांकन मागील कालावधीतील उत्पन्न लेखा शीर्षाखाली | अद्याप न दिलेल्या ₹ ४५.४३ लाख रकमेवरील अत्याधीक आकारलेल्या बाब पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन नवी दिल्लीला कळविण्यात आली आहे आणि त्यांना कमी करण्यात आलेल्या भाडेपट्टी मालमत्तेवरील भांडवली मुल्यावर आधारीत भाडे पुर्नमोजणी करण्याची विनंती करण्यात आली आहे व अत्याधिक आकारलेल्या भाडयाच्या फरकाची रक्कम परत देण्यास सांगितले आहे. फरकाची रक्कम परत मिळाल्यावर आवश्यक |

| | | |
|---|---|---|
| | करावयाचे आहे. परिणामी मागील कालावधीसाठीचे उत्पन्न, येणे आणि नफा ₹ २४.५८ लाखाने कमी दिसतो. | नोंदी लेखा पुस्तकात करण्यात येतील. |
| १४. | **घसारा आणि इतर कर्जफेड (अनुसूची १७) ₹ २९९.६२ कोटी**<br><br>अऊदा सं व सु नासिक विभागाने ₹ ५८.४६ लाख घसारा आकारण्याऐवजी २००९-१० वर्षात ₹ ३७.४५ लाख घसारा याच वर्षात भांडवलीकरण झालेल्या मालमत्ता मुल्य ₹ ६३.३७ कोटी रक्कमेवर आकारले आहे. परिमाण स्वरुप घसारा रक्कम कमी दिसण्यात नफा व स्थिर मालमत्तेवरील नेट ब्लॉक ₹ २१.०१ लाखानी जास्त दाखविण्यात आला आहे. | घसारा आकारणीमधल्या तफावतीच्या रकमेचे ₹ २१.०१ लाखाच्या घसाऱ्याचे लेखांकन जे.व्ही.नं. ९ दि. ३१-०८-१० द्वारे करण्यात आले आहे. |
| १५. | अऊदा सं व सु नासिक विभागाने मालमत्ता मुल्य ₹ १.२३ कोटी रकमेवर घसारा रक्कम ₹ १.२३ कोटी आकारलेला आहे की जो ₹ ३.०९ लाखानी जास्त आहे. (मालमत्ता मुल्याच्या ९० टक्के पेक्षा जास्त) परिणाम स्वरुप एकूण घसाऱ्याची रक्कम जास्त दिसण्यात आणि स्थिर मालमत्तेवरच्या नेट ब्लॉक ची रक्कम व नफा ₹ ३.०९ लाख रुपयानी कमी दाखविण्यात आला आहे. | जे.व्ही.नं. ७ दि. ३१-८-२०१० द्वारे जास्तीचा घसारा ₹ ३.०९ लाख मागे घेण्यात आला आहे. |
| १६ | चालु वर्षातील घसारा आकारणी सांगली विभागाने (₹ ८९.४७ लाख) कळवा विभागाने (₹ ३३.८८ लाख) कोल्हापूर विभागाने (₹ ३३.१२ लाख) व लातुर विभागाने (₹ ५.२४ लाख) इतक्या कमी रकमेने तरतूद केल्यामुळे एकूण रक्कम ₹ १.६२ कोटीने कमी दिसते. त्याचा परिणाम नेट ब्लॉक, नक्त नफा ₹ १.६२ कोटीने जास्त दिसतो. | दि. १-४-२००९ ते स्थिर मालमत्ता इतर विभागाकडे वर्ग करण्याच्या तारखेपर्यंतच्या कालावधीपर्यंत घसारा आकारणी न केल्यामुळे निर्माण झालेल्या घसारा तुट रक्कम ₹ ८३.१४ लाखाचे, लेखांकन जे.व्ही.नं. २३ दि. ऑक्टोबर १० द्वारे केले आहे.<br><br>भांडवलीकरण झालेल्या मालमत्तेवरची घसारा आकारणी महिना आधारभूत न धरता दिवस आधारभूत धरुन केल्यामुळे निर्माण |

| | | |
|---|---|---|
| | | झालेल्या घसारापुढे ₹ ३३.८८ लाखाचे लेखांकन आता केलेले आहे.<br><br>महिना आधारभूत न धरता दिवस आधारभूत धरुन केलेल्या घसारा आकारणीमुळे निर्माण झालेली घसारातुट ₹ ३९.४५ लाख लेखांकन जे.व्ही.नं. २३ (₹ ६.३३ लाख) आणि जे.व्ही. नं. १९ (₹ ३३.१२ लाख) द्वारे आता केलेले आहे.<br><br>भांडवलीकरण झालेल्या मालमत्तेवरची घसारा आकारणी महिना आधारभूत न धरता दिवस आधारभूत धरुन केल्यामुळे निर्माण झालेल्या घसारातुट ₹ ५.२४ लाखचे लेखांकन आता जे.व्ही. ६/ नोव्हेंबर १० द्वारे केले आहे. |
| १७ | **व्याज व वित्तीय आकार (अनुसूची १८)**<br>**` २०९.९९ कोटी**<br>**बांधिलकीचा आकार (कमीटमेंट चार्जेस)**<br><br>यामध्ये पी एफ सी कर्ज क्र. २१६०३०५२ आणि २१६०३०६० साठी विहित केलेल्या अनुसूचीनुसार पॉवर फायनान्स कॉर्पोरेशनला द्यावयाच्या ₹ २.७१ लाख कमीटमेंट चार्जेसचा समावेश नाही. परिणामस्वरुप खर्च, दायित्व व नफा हा ₹ २.७१ लाखाने कमी दिसतो. | सदरच्या बाबी संदर्भात पी एफ सी कॉर्पोरेशनबरोबर कमीटमेंट चार्जेसची अगदीच किरकोळ रक्कम लक्षात घेता त्यावरचा हक्क सोडून देण्याबाबत पत्रव्यवहार चालु आहे. |
| १८. | **इतर बँक चार्जेस**<br><br>कंपनीने कॅनरा व सिंडीकेट बँक मधील आपले खाते बंद केले व खाते पुस्तकातील जमा नोंदीनुसार जमा असलेली शिल्लक रक्कम दुसऱ्या बँकेकडे जमा केली. कंपनीच्या रोकड वहीनुसार जमा रक्कम ₹ ०.४६ लाख आहे व ही रक्कम कंपनीने बँक चार्जेसला जमा केली आहे. बँक खाते बंद | कंपनीने कॅनरा बँक व सिंडीकेट बँकेतील खाते बंद केलेले आहे. त्यामुळे कॅनरा बँक ( २४५०६२ ) आणि सिंडीकेट बँक ( २४५१८६ ) कडे पाठविलेले पैसे जे अद्याप मार्गस्थ आहेत ते व्यवहारही बंद केले आहेत. परंतु खाते बंद करण्यापूर्वी खात्यात ₹ ४६३४५/ - जमा रक्कम होती म्हणून सदरची |

| | | |
|---|---|---|
| | करणे व खात्यातील रक्कम इतरत्र वळवणे बाबतची कार्यवाही ही रोकड वहीतील व बँक खात्यातील नोंदीचे परस्पराबरोबर पडताळणी केल्यानंतर करणे आवश्यक होते. सदरच्या समायोजनाचा होणारा निश्चित परिणाम रिकन्सीलेशन अभावी करता येणे शक्य नाही. | रक्कम बँक चार्जेसला जमा करण्यात आली. |
| १९ | **वित्तीय परिस्थितीवर भाष्य**<br>**ताळेबंद**<br>**निधीचा वापर**<br>**स्थिर मत्ता**<br>**स्थिर मत्तेचा एकूण समुदाय (अनुसूची ५) ` ११५६९.६५ कोटी**<br><br>हया रकमेमध्ये कंपनीने म.औ.वि.महा मंडळाला अहमदनगर येथे जानेवारी १९७६ पासून ९५ वर्षाच्या भाडेपट्टी कराराने जमीन संपादित करण्यासाठी दिलेल्या ₹ ०.७० लाख भाडेपट्टी जादा रक्कम रकमेचा अंतर्भाव आहे. उपरोक्त जमीन भाडेपट्टीकराराद्वारे संपादन केलेली असल्यामुळे जमिनीच्या कर्जफेडीची तरतूद ९५ वर्ष कालावधीत करणे आवश्यक होते. परंतु तसे न केल्यामुळे घसारा मुल्य कर्जफेड तरतूद, खर्च, तुट कमी दिसण्यात व मत्ता नक्त मुल्य समुह आणि नफा ₹ ०.२५ लाखाने जास्त दिसण्यात झाला आहे. | जे.व्ही.नं. १३ दि. ३०-९-२०१० द्वारे आता ₹ ०.२५ लाखाच्या कर्जफेडीची तरतूद २४ वर्षाच्या कालावधीत करण्यात आली आहे. |
| २०. | अऊदा सं व सु विभाग नासिक विभागाने वापरात नसलेल्या मत्ता मुल्य ₹ १०.८५ कोटी त्यावरील घसारा आकारणी ₹ ९.७० कोटी मागे घेतलेली आहे. संचीत घसारा मुल्य ₹ ९.७० कोटीने मागे घेण्याऐवजी ₹ ९.४५ कोटीने मागे घेणे आवश्यक होते. परिणामस्वरुप वापरात नसलेल्या मत्ता मुल्य, संचीत घसारा मुल्य कमी दिसण्यात व नक्त स्थिर मालमत्ता समुह मुल्य ₹ २५.१५ लाखाने जास्त दिसण्यात झाला आहे. | आता जे. व्ही. नं. ६ दि. ३१-८-२०१० द्वारे आवश्यक ती दुरुस्ती करण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| २१. | यामध्ये एलिचपूर सब स्टेशनच्या कामाच्या संदर्भात चुकीने ₹ ४.८६ कोटी खर्च टाकलेल्या रकमेचा समावेश आहे. जास्तीच्या रकमेचे भांडवलीकरण केले गेल्याने स्थिर मालमत्ता मुल्य अधिक दिसण्यात आणि प्रगतीपथावरील भांडवली कामाचे मुल्य तितक्याच रकमेने कमी दिसण्यात झाली आहे. | आवश्यक ती दुरुस्ती जे.व्ही.क्र. १५ आणि १६ दि. ३०-९-२०१० द्वारे जास्तीच्या भांडवलीकरणाची रक्कम व घसारा निधी मागे घेण्यासाठी केलेली आहे. |
| २२ | या मध्ये १९८४-८५ पासून वापरात नसलेल्या सात वहानांचा (₹ ८.०२ लाख) व क्रेन (₹ २.६८ लाख) असे एकुण ₹ १०.७० लाख रुपयाच्या रकमेचा समावेश आहे. सदरचे वर्गकिरण वापरात नसलेल्या मत्ता शिर्षकाखाली होणे जरुरीचे होते. परिणामस्वरुप स्थिर मत्ता मुल्य वाढण्यात आणि वापरात नसलेल्या मत्तेचे मुल्य तितक्याच रकमेने कमी होण्यात झाला आहे. | पनवेल विभाग अंतर्गत १ क्रेन व ३ वहाने वापरात नसलेली आहेत. यापैकी क्रेन व २ जीप वहानाचे निरुपयोगी (Scrap) ठरवण्यासंबंधीचे प्रस्ताव मंजुर झालेले आहेत व राहिलेल्या वहानाचे निरुपयोगी ठरवण्यासंबंधीचे प्रस्ताव लवकरच तयार केले जात आहेत आणि दुरुस्ती जे.व्ही.द्वारे सदरच्या घसा-या सहीत स्थिरमता अप्रचलित मत्ता शिर्षकाकडे वर्ग करण्यात आल्या आहेत. बांधकामात कळवा मंडळाकडे असलेल्या ३ वाहनापैकी १ क्रेनचा निरुपयोगी ठरविण्याचा प्रस्ताव मंजुर झालेला आहे व राहीलेल्या २ वाहनांचा प्रस्ताव तयार केला जात आहे. आवश्यक ती दुरुस्ती जे.व्ही.द्वारे क्रेन निर्लेखना संबंधात लेखांकीत केली आहे. |
| २३ | **दिलेला अग्रीम भाडेपटटा वित्त प्रकल्प ` १५३.७८ कोटी-**<br>हे (ILFS) कडून वित्त भाडेपट्टयाद्वारे संपादीत केलेल्या भाडेपट्टी कराराद्वारे दिल्या गेलेल्या भाड्याइतक्या समान रकमेचे दायित्व निर्माण केले गेलेल्या रकमेचे प्रतिनिधीत्व करते. कंपनीने मार्च-२०१० अखेर वित्त भाडेपट्टयाच्या दायित्वाची परतफेड केली आहे व कुठलेही वित्त भाडेपट्टयाच्या भाड्याचे दायित्व उरलेले नाही.<br>कंपनीने मुद्दल रकमे इतक्या वित्त भाडेपट्टीच्या भाड्याच्या रकमेची परतफेड ही दायित्व खात्याद्वारे करण्याऐवजी नफा तोटा पत्रक खात्यामधून (व्याज व वित्तीय शुल्क) व व्याज व वित्तीय शुल्क रकमेच्या मर्यादेइतक्या रकमेचे लेखांकनही नफा तोटा पत्रक खात्यामधून केलेले आहे. त्यामुळे दायित्व | हे पूर्वीच्या म.रा.वी, मंडळाकडून प्राप्त झालेल्या हस्तांतरण योजनेमध्ये असलेल्या आरंभीच्या शिलकीनुसार आहे. अग्रिम प्रदान वित्त भाडे प्रकल्प खाते क्र. २७.८७० ₹ १५३.७८ कोटी नावे एच.व्ही.डी.सी. आय.एल.एफ.एस. खाते नं. २७८८० ₹ १५३.७८ कोटी जमा म.रा.वि.वि. कंपनी मर्या. कडून ह्या संबंधातील बाबीचा आवश्यक तपशील मिळविण्यात येत आहे. तो प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | खाते अनिश्चीत अवस्थेत आहे. त्याच प्रमाणे भाडेपट्टीने घेतलेल्या मत्तेवर घसारा आकारणीही केली नाही. त्यामुळे मत्ता रक्कम घसारा आकारणी इतक्या रकमेने ३१/ ३/ १० रोजी जास्त दिसते. भाडेपट्टी करारपत्राप्रमाणे केलेल्या परत फेडीची रक्कम व या व्यवहाराचा नफातोटा पत्रक व ताळेबंद यावर होणारा परिणाम भाडेपट्टी कराराच्या तपशिलाअभावी निश्चित करता येत नाही. | |
| २४ | **प्रगतीपथावरील भांडवली कामे (अनुसूची ६ )**<br>**` ३०९५.१४ कोटी –**<br><br>पुर्नस्थापीत मत्तेच्या यामध्ये ₹ ३.३७ कोटी इतक्या विविध रकमेचा समावेश आहे. (आतील स्विचगीयरच्या जागी बाहेरील स्विचगीअर १३२ कोटी अहमदनगर व कोपरगांव सब स्टेशन येथे पुर्नस्थापित करणे) आणि ₹ ४०.२१ कोटीची एकुण ७ सबस्टेशन्स कामे औरंगाबाद विभागात दि. ३१.३.२०१० रोजी पूर्ण/ चालु करणे. परंतु चालु वर्षात त्याचे भांडवलीकरण केलेले नाही. पूर्ण झालेल्या व कार्यान्वीत झालेल्या मत्तेचे भांडवलीकरण न केल्यामुळे प्रगतीपथावरील कामाच्या रकमेचे मूल्य जास्ती व स्थिर मालमत्तेचे मूल्य ₹ ४३.५८ कोटी रकमेने कमी दिसते. | अ.ऊ.दा. सं. व सु. मंडळ नासिक ने ३१.०३.२०१० ला ₹ ३.३७ कोटीची मत्ता पूर्णही केलेली आहे व कार्यान्वीतही केली आहे. पण आता जे.व्ही. नं. ८ दि. ३०.४.१० द्वारे मत्तेचे भांडवलीकरण केलेले आहे. ₹ ४०.२१ कोटी कामाच्या पूर्णत्वाचा दाखला दि. ३१.३.१० पर्यंत औरंगाबाद विभागास प्राप्त झाला नव्हता आता तो प्राप्त झाल्यामुळे मत्तेचे भांडवलीकरण व त्यावर घसारा आकारणी करण्यात आली आहे. |
| २५ | **पुरवठा कारांना अग्रीम देणे : ₹ ११३.१० कोटी**<br><br>यामध्ये ₹ ४.१७ कोटीचा कोल्हापूर विभागात जमा खात्यात दाखविलेल्या रकमेचा अंतर्भाव आहे. त्याचे समायोजन होणे जरुरीचे आहे. | पुरवठाकारांना अग्रिम देणे खाते जमा रक्कम दाखवते त्याचा गटानुरुप सविस्तर तपशील खालील प्रमाणे आहे.<br>गट २५ जमा रक्कम ₹ ४१६८६५९६/-<br>२५४००.२ ₹ ७३००००/- नावे<br>२५५००-९ ₹ ४२४१६५९६ ₹ जमा<br>(₹ ६२२९८१६५/- जमा व<br>₹ १९८८१५६९ नावे ) |

| | | |
|---|---|---|
| | | जमा रक्कम दिसण्याचे कारण असे की, अग्रीम, मुख्य कार्यालयाने प्रदान केला आहे व त्याची वसुली अतिउच्चदाब तारमार्ग विभाग कोल्हापुर ने केला आहे परंतु नावे आणि जमा आंतरशाखा समायोजन दोन्ही विभागाकडून पाठविले गेले नाहीत त्यामुळे अग्रीम वसुली जमा रक्कम दाखवत आता जे.व्ही. नं. २२ दि. २२.१०.१० द्वारे सदरची जमा रक्कम मुख्य कार्यालयाकडे पाठवून दुरुस्ती करण्यात आली आहे. |
| २६ | **वापरात नसलेल्या मत्ता : ` १२.७९ कोटी –**<br><br>सं. व सु. मंडल कराड ने ₹ १.७६ कोटी वापरात नसलेल्या मत्ता म्हणून दाखविल्या आहेत म्हणजेच वापरात नसलेल्या स्थिर मत्तेचा नक्त समुह तथापि गणनेप्रमाणे वापरात नसलेल्या नक्त मत्ता समुह मुल्य ₹ १.६० कोटी होते. गणन चुकीमुळे वापरात नसलेल्या मत्ता मुल्य अधिक व नक्त स्थिर मत्ता मुल्य ₹ १६.१९ लाखाने कमी दिसते | जे. व्ही. नं. १९ दि. ३१.१०.२०१० द्वारे आवश्यक ती दुरुस्ती करण्यात आली आहे. |
| २७ | **चालु मत्ता कर्ज आणि अग्रीम ( अनुसूची-८) : ` १३८१.५८ कोटी वस्तुसूची (मालसाठा) ` २९८.९९ कोटी**<br><br>यामध्ये भांडारात मिळालेल्या सामुग्रीचा आणि दि. २९.३.१० पर्यंतच्या तपासणी अधीन असलेल्या परंतु भांडारात प्राप्त झालेल्याची नोंद (S. R. Note) न बनविल्यामुळे वार्षिक लेख्यामध्ये लेखांकन न झालेल्या रक्कम ₹ २४५६.७८ लाख चा समावेश नाही परिणामस्वरुप तपासणी बाकी असलेल्या सामुग्री साठ्याचे (भांडवली) मूल्य ₹ २४५६.७८ लाखाने कमी दिसण्यात तसेच दायित्व तितक्याच रकमेने कमी दिसण्यात झाले आहे. | माहे मार्च-१० मध्ये वस्तुसूची सामुग्रीची प्रत्यक्ष पडताळणी दि. २९.३.१० ते ३१.३.१० (तीन दिवस) दरम्यान करण्यात आली होती. कामाच्या तयारीसाठी म्हणजेच मोजमाप/ वस्तुना चिठ्या लावणे / सामुग्रीचा पुर्नसाठा (Restocking) भांडारात प्राप्त झालेल्या सामुग्रीची नोंद (S.R.Note) दि. २२.३.१० ते ६.४.१० दरम्यानच्या काळात पाठविण्यात आली नव्हती सर्व भांडारप्राप्य सामुगीची नोंद (S.R.Note) पाठविणे व सामुग्री साठ्याला घेणे इ. कामाची नोंद चालु वर्ष २०१०-११ मध्ये करण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| २८ | यामध्ये मे. मॉडर्न इन्स्टूमेंटस प्रायव्हेट लिमीटेड यांनी पुरवठा केलेल्या सदोष / नाकारलेल्या ₹ ७४.०२ लाख किमतीचा ७६.०५९ किलोमीटर ०.२ असीएसआर पँथर संवाहकाच्या किमतीचा साठ्यात समावेश केल्यामुळे साठा मुल्यात जास्तीची वाढ व खर्च कमी दिसण्यात (सदोष मालाची तरतुद) तसेच नफा तिक्याच रकमेने जास्त दिसण्यात झाला आहे. | सदरची बाब पत्रव्यवहाराधीन आहे आणि म्हणून भांडारप्राप्य सामुग्रीची नोंद बनविण्यात आली नाही व ह्याचे लेखांकन प्रमुख भांडार औरंगाबाद यांच्याकडील साठ्यामध्ये केलेले नाही. |
| २९ | यामध्ये कंपनीने मे. ॲक्टीव्ह इंजिनिअर्सच्या वतीने भरलेल्या वर्क कॉन्टॅक्ट टॅक्स रक्कम ₹ २.७२ लाखचा समावेश आहे. ५ वर्षाचा कालावधी उलटून गेलेला असताना सुध्दा सदरची रक्कम समायोजीत करता न आल्यामुळे अनिर्णित अवस्थत आहे त्यामुळे ह्या रकमेचे वर्गकिरण बुडीत व शंकास्पद कर्ज ह्या शीर्षकाखाली होणे आवश्यक होते. परिणामस्वरुप चालू मत्ता मूल्य अधिक दिसण्यात व बुडीत व शंकास्पद कर्ज रक्कम कर्ज तितक्याच रकमेने कमी दिसण्यात व नफा ₹ २.७२ लाखानी जास्त दिसण्यात झाला आहे. | या बाबतीत कंत्राटाच्या किंमतीत वर्क कॉन्ट्रक्ट टॅक्सचा समावेश आहे अथवा नाही या संदर्भात निविदा व वर्क ऑर्डरमध्ये अनिश्चितता हाती सर्वसाधारणपणे कंत्राटाच्या किमतीत वर्क कॉन्ट्रॅक्ट टॅक्सचा अंतर्भाव असतो. वरील बाब तपासणीअधीन आहे व लवकरच आवश्यक ते लेखांकन केले जाईल. |
| ३० | **म.रा.वी. निर्मीती कंपनीकडून प्राप्त रक्कम ` २९.७७ लाख –**<br><br>म.रा.वी.पारेषण कंपनीने रुपांतरीत न करता येण्याजोग्या आय.एफ.सी.एल यांच्या कर्जरोख्याच्या पुनर्बांधणीकरीता रक्कम ₹ २९.७७ लाख शुल्क वर्ष २००६ मध्ये दिले होते. नंतर हे कर्ज म.रा.वी.निर्मिती कंपनी कडे हस्तांतरीत करण्यात आले व पुनर्बांधणी शुल्क परत मिळण्यासाठी दावा सांगितला गेला परंतु तो निर्मिती कंपनीने अमान्य केला. परिणामस्वरुप किरकोळ येणी रक्कम जास्तीची दिसते व खर्च व नफा प्रत्येकी रु. २९.७७ लाखाने कमी दिसतो. | म.रा.वीज पारेषण कंपनीने रुपांतरीत न करता येण्याजोग्या आय.एफ.सी.एल यांच्या कर्जरोख्याच्या पुनर्बांधणीसाठी ₹ २९.७७ लाख शुल्क वर्ष २००६ मध्ये दिले होते नंतर हे कर्ज म.रा.वि.निर्मिती मर्या. कंपनीकडे हस्तांतरीत करण्यात आले व पुनर्बांधणी शुल्क परत मिळण्यासाठी दावा सांगितला गेला. सदरच्या बाबीसंदर्भात अद्यापही पत्रव्यवहार चालू आहे. |

| | | |
|---|---|---|
| | **रोख व बँकेतील शिल्लक ` ३५९.०७ कोटी –** | |
| ३१ | यामध्ये भांडुप विभागाने प्रदान केलेल्या व प्रदान केलेल्या व्यक्तीने बँकेत जमा न केलेल्या मुदत बाह्य धनादेश रक्कम ₹०.४३ लाखाचा समावेश नाही. परिणाम स्वरुप रोख व बँकेतील शिल्लक आणि दायित्वे हे ₹ ०.४३ लाखाने कमी दिसते. | ₹ ०.४३ लाखाचे लेखांकन वित्तीय वर्ष २०१०-११ च्या मे व जुलै-१० मध्ये केले आहे. |
| | **रक्कम आधी प्रदान केलेले खर्च ` १०.१३ कोटी –** | |
| ३२ | सदरची रक्कम, दीर्घ कालावधीची कर्जे पुनर्बांधणीसाठी केलेल्या खर्चाचे व निर्लेखीत करावयाचे राहुन गेलेल्या रकमेचे प्रतिनिधीत्व करते. सदरच्या खर्चाचे स्वरुप हे स्थगीत महसुली खर्च असे असल्याने तशा प्रकारे खर्चाचे वर्गकिरण करणे आवश्यक होते. | कंपनी ही पुवर्चिया वर्षात एल.आय.सी, पी.एफ.सी, आणि आर.इ.सी, यांच्याकडून कर्जाच्या पुर्नबांधणीसाठी खर्च केलेल्या अधिमूल्याच्या काही भागाचे निर्लेखन करीत आली आहे व राहिलेल्या कर्जाच्या पुनर्बांधणीसाठीचे अधिमूल्य अनुसूची २३ मध्ये स्थगीत खर्च म्हणून दाखविले आहे तथापी सनदी लेखापाल संस्था, भारत यांच्या तज्ञ सल्लागार समितीच्या मतानुसार एका समान बाबीत अधीक उच्च व्याजदर असणा-या कर्जाच्या पुनर्बांधणी साठी दिलेले अधिमूल्य हे लांबणीवर टाकले जाऊ शकते व सदरचा खर्च कंपनीने ज्या कालावधीत कमी व्याजदराचा लाभ घेतला आहे अशा कालावधीत म्हणजेच कर्जाच्या कालावधीत समान रुपाने विभाजन करता येईल. अशा बाबीमध्ये पुनर्बांधणीचे अधिमुल्य हे रक्कम आधी प्रदान केलेले खर्च समजण्यात यावेत व त्याचे निर्लेखीकरण सध्या प्रचलीत असणा-या रकमेच्या काही भागाचे वर्गकिरण महसुली खर्च म्हणून करण्यात येते त्याप्रमाणे करण्यात यावे. |
| | **निधीचे स्त्रोत–**<br>**चालु दायित्वे आणि तरतुदी**<br>**चालु दायित्वे (अनुसूची-९) ` १९५५.०२ कोटी** | |

| | | |
|---|---|---|
| | **इतराना देणे असलेले ₹ ५५२.६० कोटी कामाच्या अंमलबजावणीसाठी ठेव.** | |
| ३३ | अ.ऊ.दा. सं. व सु. नासिक विभागाने ₹ ५७.८५ लाख संकीर्ण जमा खात्यामध्ये जमा केले आहेत व ग्राहकाकडून थेट वर्गणी खात्यापोटी नावे केले आहेत. ही ठेव जास्तीची नसल्यामुळे संकीर्ण जमा खात्यामध्ये जमा दाखववयास नको होते. परिणामस्वरुप उत्पन्न व नफा अधिक दिसण्यात व चालु दायित्वे ₹ ५७.८५ लाखाने कमी दिसतात | ही रक्कम म्हणजे वित्तीय वर्ष २००८-०९ च्या स्थलांतरीत लेख्यामध्ये मत्ते पोटी ग्राहकाकडून मिळालेल्या थेट वर्गणीचे समायोजन केले असल्यामुळे जे.व्ही. नं.९८ दि. ३१.३.२००९ द्वारे रक्कम ₹ ५७.८५ लाख लेखा संहिता ५५१०३ ला नावे केली आहे. व लेखा संहिता १०५४३ ला जमा दाखविली आहे. |
| ३४ | यामध्ये उरमोडी धरण सब स्टेशन योजने करिता ठेव म्हणून मिळालेल्या रक्कम ₹ १.७१ लाखचा समावेश आहे. ही योजना पूर्ण झाली आहे व ३१/३/१० पुर्वी त्याचे भांडवलीकरणही झाले आहे तथापी ठेव रकमेचे समायोजन केले गेलेले नाही. स्थिर मत्तेशी ठेवीचे समायोजन न केल्यामुळे इतर चालु दायित्वे व स्थिर मत्ता मुल्य तितक्याच रकमेने जास्तीचे दिसते. | आता जे.व्ही. नं. १० दिनांक ३०.११.१० द्वारे ₹ १.७१ लाख किमती ठेवीचे स्थिर मत्ते पोटी समायोजन करण्यात आले आहे. |
| | **ग्राहकाचे अनुदान : ₹ ४८४.४३ कोटी -** | |
| ३५ | यामध्ये निवळीफाटा सब स्टेशन योजनेसाठी २००७-०८ व २००८-०९ वर्षामध्ये मिळालेल्या रक्कम ₹ ४.८२ कोटी अनुदानाचा समावेश आहे आणि ३१-३-२०१० पूर्वीजी ११ कामे पूर्ण झाली कार्यान्वीत झाली ती ₹ ७.४३ कोटी तथापि मिळालेल्या अनुदानाचे समायोजन स्थिर मालमत्तेबरोबर केलेले नाही. अनुदान समायोजनेअभावी अनुदान खात्यातील व स्थिर मालमत्तेची किंमत वरील रकमेने जास्ती दिसते. | तांत्रिक तपशील उपलब्ध न झाल्यामुळे अनुदानाच्या रकमेचे समायोजन स्थिर मालमत्तेबरोबर केले गेले नाही. आता जे.व्ही. नं. २१ दिनांक ३१.१०.२०१० द्वारे अनुदानाच्या रकमेचे समायोजन स्थिर मालमत्तेबरोबर केले आहे. |
| | **पुरवठाकाराकडून / कंत्राटदाराकडून ठेऊन घेतलेली रक्कम-** | |
| ३६ | यामध्ये पनवेल विभागाने मार्च-२०१० अखेरपर्यंत पुरवठाकार/ कंत्राटदार यांच्या बिलामधुन ठेऊन घेतलेल्या रक्कम ₹ ३.२० | निलंबीत नोंदणीपुस्तकात आढळलेली रकमेतील तफावत ₹ २८.८७ लाख ही रक्कम पुढे ओढण्यात केलेल्या चुकीमुळे |

| | | |
|---|---|---|
| | कोटीचा समावेश आहे. कंत्राटदारा नुसार/ पुरवठाकारानुसार निलंबीत नोंदणीपुस्तक ठेवलेले आहे. परंतु त्यामध्ये शिल्लक रक्कम ₹ ३.४९ कोटी दाखवली आहे. रकमेतील तफावत ₹ २८.८७ लाखात ताळमेळ लावणे आवश्यक आहे. | आहे. आता त्याची दुरुस्ती करण्यात आली आहे. |
| ३७ | **उपार्जित परंतु कर्जावरील देय नसलेले व्याज ₹ ५४.६५ कोटी**<br>**खाजगी रोखे उपार्जित परंतु देय नसलेले व्याज ₹ १४.८८ कोटी-**<br><br>हे अगोदरच्या वर्षात तरतुद केलेल्या रोख्यावरील देय झालेल्या व्याजाचे प्रतिनिधीत्व करते. व्याज व वित्तीय शुल्कापोटी देय असलेली रक्कम कंपनीने वेळोवेळी जेव्हा ती देय झाली त्या त्या वेळी ती प्रदान केली आहे व संबंधीत वर्षात त्याचे लेखांकनही खर्च म्हणून केले आहे. लेखांकन करताना त्यासाठी केलेल्या ₹ १४८८.२५ लाख तरतुदीचे समायोजन केलेले नाही. परिणामस्वरुप व्याज व वित्तीय शुल्क, दायित्व यांच्या रकमेत अधिक वाढ दिसते आणि नफा ₹ १४.८८ कोटीनी कमी दिसतो. | या बाबतीत असे सांगायचे आहे की हे पुवर्चिया म.रा.वि. मंडळाकडून हस्तांतरण योजनेअंतर्गत दाखविलेल्या आरंभीची शिल्लक प्रमाणे आहे. सदरची रक्कम ही लेखा संकेत ४६.७४६ शिर्षकाखाली (खाजगी रोखे उपार्जित परंतु देय नसलेले व्याज) ₹ १४.८८ कोटी आहे. सदर रकमेचा निपटारा हस्तांतरण योजनेला अंतिम स्वरुप देतेवेळी होईल. |
| ३८ | **भारतीय चलनातील कर्ज -**<br>**आय.एल. व एफ.एस.मुंबई ` ०.४२ कोटी वरील उपार्जित परंतु देय नसलेले व्याज.**<br><br>हे नागोठणे वडखळ ४०० के.व्ही. पारेषण वाहिनी उभारणी करण्यासाठी मे. आय.एल. व एफ. एस. मुंबई यांच्याकडून १९९६ मध्ये घेतलेल्या कर्जापोटी द्याव्या लागणा-या व्याजासाठी निर्माण केलेल्या दायित्वाचे प्रतिनिधीत्व करते. कंपनीने व्याजासहीत कर्जाचे दायित्व संपूर्णपणे फेडलेले आहे आणि म्हणून हे दायित्व मागे घेणे आवश्यक होते. परिणामस्वरुप दायित्वाची रक्कम जास्तीची दिसते व नफा ₹ ०.४२ कोटीने कमी दिसतो. | म.रा. वि. मंडळ सुत्रधार कंपनीच्या दि. २६.०९.२००६ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत ठराव क्र. २००६-२७ कलम १४ दिनांक २४.११.२००६ नुसार पारित झालेल्या व मंजुरी दिलेल्या दुय्यम कंपनीच्या आरंभीच्या ताळेबंद मधील पुवर्चिया म.रा.वी.मंडळाच्या वारस कंपनीमध्ये झालेले हे दायित्वाचे वर्गकिरण आहे ह्या बाबतीत अंतीम निर्णय हस्तांतरण योजनेला अंतीम स्वरुप देतेवेळी घेण्यात येईल. म्हणून |

| | | |
|---|---|---|
| | | म.रा.वी.पा. वाहिनीकडे वर्गकिरण करण्यात आलेले दायित्व आता दाखविले आहे त्याप्रमाणेच पुढे दाखविले जाईल. |
| ३९ | **कर्मचा-याशी संबंधी दायित्वे व तरतुदी ₹ ९३.२५ कोटी नियोजित मालमत्तेमध्ये पडणा-या तुटीसंबंधी तरतुद : ₹ ७.९२ कोटी**<br><br>कंपनीने भ.नि.नि. विश्वस्त संस्थेच्या मत्तेच्या मुल्यनिर्धारणासाठी नेमलेल्या सल्लागाराकडून प्राप्त झालेल्या मुल्यनिर्धारण अहवालास अनुसरुन ₹ ७.९२ कोटीची नियोजित मालमत्तेमध्ये पडणा-या तुटीसाठीची तरतुद केलेली आहे. परंतु अहवालाची छाननी करता असे आढळले आहे की, कंपनीने ₹ ३०३.५२ कोटीच्या उपार्जित परंतु देय नसलेल्या दि. ३१.३.१० पर्यंतच्या गुंतवणुकीवरील व्याजाचा एकुण मालमत्तेची किंमत ठरविताना विचार केला गेलेला नसल्यामुळे मुल्य निर्धारण अहवाल चुकीचा आहे. परिणाम स्वरुप मत्तेचे मुल्यनिर्धारण ₹ ३०३.५२ कोटीने कमी झालेले आहे. पर्यायाने ₹ ७.९२ कोटीची तरतुद करणे आवश्यक आहे. परिणामस्वरुप खर्च, दायित्व जास्तीचे दिसण्यात व नफा ₹ ७.९२ कोटीने कमी दिसण्यात झाला आहे. | या संदर्भात असे सांगावयाचे आहे की, लेखामानक-१५ (कर्मचाऱ्याचे फायदे) नुसार नियोजित मालमत्तेत पडणा-या तुटीसाठीची तरतुद ही कंपनीने मे. कॉन्ट्रक्टर नायक आणि किशनादवाला यांच्याकडून प्राप्त झालेल्या मुल्यानिर्धारण अहवालास अनुसरुन केलेली आहे. कंपनी अशाप्रकारची तरतुद नियमीतपणे लेखा मानक १५ (कर्मचा-याचे फायदे) मध्ये विहित केलेल्या बाबीच्या आवश्यकतेनुसार मुल्यनिर्धारण अहवालास आधारभूत धरुन गरजाची पुर्तता करीत आहे. |
| ४० | **इतर दायित्वे व तरतुदी : रु. ६.४५ कोटी**<br><br>यामध्ये २००९-१० वित्त वर्षासाठीच्या ₹ ५९.२० लाखाच्या दायित्वाच्या रकमेचा समावेश नाही. परिणामस्वरुप दायित्वाची रक्कम ₹ ५९.२० लाखाने कमी दिसण्यात आणि त्या अनुषंगाने स्थिर मत्ता मुल्य भांडवली प्रगती पथावरील कामे, प्रशासकीय खर्च हा अनुक्रमे ₹ ५.७८ लाख, ₹ ४८.७६ लाख आणि ₹ ४.६६ लाखाने कमी दिसण्यात झाला आहे. | सदरच्या दायित्वाच्या रकमेची तरतुद वित्तीय वर्ष २०१०-११ मध्ये केली गेलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| ४१ | यामध्ये उस्मानाबाद भांडार येथे दि. २९.३.१० ते ३१.३.१० या कालावधीत प्राप्त झालेल्या ₹ ८०.३५ लाख किमतीच्या सामुग्रीचा समावेश नाही. दि. ३१.३.१० पुर्वप्राप्त झालेल्या सामुग्रीचे लेखांकन न केले गेल्यामुळे चालु दायित्वे व साठा मुल्य उपरोक्त रकमेने कमी दिसते. | याचे लेखांकन वित्तीय वर्ष २०१०-११ मध्ये केलेले आहे. |
| ४२ | या मध्ये मे. फरहट अब्बास यांना मे-२००९ मध्ये उर्जा राहित्राच्या वाहतुकीसाठी मे-२०१० मध्ये प्रदान केलेल्या ₹ ३.४६ लाखाच्या वहातुकखर्चाच्या रकमेचा समावेश नाही वहातुक खर्चाच्या रकमेचे लेखांकन न केले गेल्यामुळे इतर दायित्वे व स्थिर मत्ता मुल्य उपरोक्त रकमेइतके कमी दिसण्यात झाला आहे. | मे. फरहट अब्बास यांना वहातुक खर्चापोटी देय असलेले ₹ ३.४६ लाखाचे देयक मंडळ कार्यालयास औरंगाबाद विभागाकडून पाठविण्यात आले होते. सदरच्या विभागाकडून दायित्वाची तरतुद केलेली होती. परंतु काही खुलाशासाठी सदरचे देयक उपविभागीय कार्यालयाकडे पाठविण्यात आले. हे देयक उपविभागीय कार्यालयाकडून औरंगाबाद विभागाकडे दि. २०.४.१० रोजी खुलाशाचे स्पष्टीकरणासहीत परत पाठविण्यात आले व औरंगाबाद विभागाकडून मंडल कार्यालयास दि. २२.४.१० रोजी पाठविण्यात आले. सदरचे देयक काही खुलाशाअभावी स्थगीत ठेवलेले असल्यामुळे नजरचुकीने दायित्वाची तरतुद करणे राहुन गेले. |
| ४३ | यामध्ये वित्तीय वर्ष २००९-१० मधील खर्चापोटी अदत्त दायित्वाची रक्कम ₹ ६.६८ लाखाचा समावेश नाही. अदत्त दायित्वाच्या रकमेची तरतुद न केली गेल्यामुळे चालु दायित्व, खर्च व तुट ₹ ६.६८ लाखाने कमी दिसते. | ₹ ६.६८ लाखाची तरतुद करावयाची राहुन गेली आहे. आता वित्तीय वर्ष २०१०-११ मध्ये जे.व्ही. नं. ४४ दि. ३१.१०.१० द्वारे त्याचे लेखांकन करण्यात आले आहे. |
| | **तदतुदी (अनु. १०) रु. ४८४.९८ कोटी** **रजेच्या रोखीकरणासाठी तरतुद रु.१७९.१७ कोटी.** | |
| ४४ | यामध्ये रु. ७.०२ लाख रजेच्या रोखीकरणापोटी कर्मचा-यांना २००९-१० मध्ये देय असलेल्या दिलेल्या परंतु २०१०-११ मध्ये प्रदान केलेल्या रकमेचा अंतर्भाव नाही. तरतुद न केल्यामुळे इतर चालू दायित्वे, खर्च कमी दिसतो व नफा ₹ ७.०२ लाखाने जास्ती दिसतो. | रजेच्या रोखीकरणासाठीची तरतुद करावयाचे राहुन गेले आहे. ₹ १.५२ लाखाची तरतुद वित्तीय वर्ष २०१०-११ मध्ये जे.व्ही. नं. २२ दि. ३०.१०.१० द्वारे कोल्हापूर बांधकाम मंडळाने केलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | रजेच्या रोखीकरणासाठीची तरतुद करावयाचे राहुन गेले आहे. ₹ ५.५० लाखाची तरतुद वित्तीय वर्ष २०१०-११ मध्ये कराड सं. व सु. मंडळाने केलेली आहे. |
| ४५ | **प्रगटीकरणावरील भाष्य - लेख्यांवर टिप्पणी करआकारणी वर्ष २००७-०८ साठीचे आयकर दायित्व-**<br><br>आयकर खात्याने, कर निर्धारण वर्ष २००७-०८ साठी त्यांच्या पत्र क्र. १६ सप्टेंबर २०१० च्या मागणी पत्राद्वारे ₹ ७.४२ कोटीच्या जास्तीच्या आयकराची मागणी केली होती परंतु त्या संबंधीची कंपनीने तरतुद केली नाही. अथवा लेख्यामध्ये त्याचे प्रकटीकरणही केले नाही. | म.रा.वि.पारेषण कंपनी मर्यादितला आयकर विभागाकडून करनिर्धारण वर्ष २००७-०८ वर्षासाठी आयकर ₹ ७.४२ कोटीचे मागणीपत्र दि. १४.१०.१० रोजी म्हणजेच लेख्यास अंतीम स्वरुप दिल्यानंतर (दि. २३.०९.१० नंतर) मिळाले. त्या मुळे त्याची तरतुद व लेख्यामध्ये प्रकटीकरण करता आले नाही. |
| ४६ | **अनिश्चित दायित्व :**<br><br>मे. मायक्रो अँड स्मॉल एंटरप्रायझेस फॅसीलीटेशन कौन्सीलने म.रा.वि.पा.कं. मर्यादित यांच्या नावे, मे. मिनर्व्हा स्विचगेअरस आणि कंट्रोल्स नागपूर व सिग्मा ट्रान्सफॉर्मर्स प्रायव्हेट लिमीटेड नागपुर यांच्याकडून केलेल्या खरेदीपोटी देयक देण्यास लावलेल्या विलंबाबद्दल व्याजापोटी ₹ १.४६ कोटी व ₹ ५४.८२ लाख देण्यासाठी आदेश निर्गमीत केला होता. कंपनी जरी कायदेशीर निकालाच्या ७५ टक्के रक्कम ठेव म्हणून भरताना वरच्या कोर्टात दाद मागण्याच्या तयारीत असली तरी त्या संबंधीची तरतुद केलेली नाही व तसे लेख्यामध्ये प्रकटीकरणही केलेले नाही. | न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार सदरची रक्कम जिल्हा न्यायालय नागपूर मध्ये ठेवलेली आहे. सदरची बाब न्यायप्रविष्ट आहे व त्याचा निकाल अद्याप लागावयाचा आहे. |

नियंत्रक व महालेखापाल परिक्षक यांच्यावतीने निर्गमित व स्वाक्षरीत

सही/-
**एस. जाफा**
महालेखाकार (वाणिज्यिक लेखापरिक्षा)

ठिकाण : मुंबई
दिनांक : ३०/१२/२०१०

**महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी मर्यादित करीता**

**सही**
**अरविंद सिंह**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
मुंबई

ठिकाण : मुंबई
दिनांक : ३०/१२/२०१०

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
## लेखा परीक्षकांचा अहवाल

१. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित कंपनीच्या ( यानंतर म.रा.वि.पा.कं.म. असे संबोधले आहे. ) दि. ३१-०३-२०१० रोजीच्या ताळेबंदाचे व त्यास जोडलेल्या ३१ मार्च २०१० रोजीच्या नफा तोटा व रोकडीच्या स्त्रोताच्या पत्रकाचे आम्ही परीक्षण केले. या वित्तीय विवरण पत्राची जबाबदारी कंपनी व्यवस्थापनाची आहे. आम्ही केलेल्या लेखा परिक्षणाच्या आधारे आर्थिक विवरण पत्रावर आमचे मत देणे ही आमची जबाबदारी आहे.

२. सर्वसाधारणपणे भारतामध्ये मान्य करण्यात आलेल्या लेखापरिक्षण विषयक पद्धतीनुसार आम्ही लेखा परिक्षण केले आहे. सदर पद्धतीनुसार आमच्याकडून अपेक्षा अशी आहे की वित्तीय विवरण वस्तुगत असत्यकथना पासून मुक्त असल्याची योग्य ती खातरजमा करण्याच्या दृष्टीकोनातून आम्ही योजना व कृती करावी. वित्तीय विवरण पत्रामध्ये दिलेल्या रकमेचे व खुलाशांचे आधारभूत पुरावे नमुन्यादाखल तपासणे या बाबींचा परिक्षणामध्ये समावेश असतो. तसेच उपयोगात आणलेली लेखा तत्त्वे, व्यवस्थापनाने केलेले महत्त्वाचे अंदाज आणि एकूणच विवरण पत्राचे सादरीकरण याचे मुल्यमापन करणे याचा परिक्षणामध्ये समावेश असतो. आम्हाला विश्वास आहे की आमच्या अभिप्रायाला आमच्या लेखा परिक्षणाचा योग्य आधार आहे.

३ कंपनी अधिनियम १९५६ कलम २२७ उपकलम (४अ) अंतर्गत भारत सरकारने बनविलेल्या कंपनी (लेखा परिक्षकांचा अहवाल) आदेश २००३ आणि कंपनी (लेखा परिक्षकांचा अहवाल) (सुधारित) आदेश २००४ मध्ये केलेल्या सुधारणा अंतर्गत नमूद केलेल्या आदेशातील परिच्छेद ४ व ५ मधील कंपनीला लागू असणाऱ्या बाबी संबंधीचे विवरण परिशिष्ट म्हणून जोडले आहे.

४ खालील बाबींकडे आम्ही आपले लक्ष विशेष करुन वेधू इच्छितो.

